
कार्य हाच
परिचय
विकास हेच
उद्दिष्ट
प्रभाग क्र. 4
वाघोली - खराडी
सौ.रत्नमाला संदिप सातव
» नगरसेविका : पुणे महानगरपालिका
» सदस्य : स्थायी समिति पुणे महानगरपालिका
श्री.संदिप (आबा) सातव
» सरचिटणीस : भारतीय जनता पार्टी पुणे जिल्हा
» सदस्यः पुणे महानगरपालिका शा.नि. समिती | » मा. उपसरपंच, वाघोली

# परिचय पत्रक



## नाव

**श्री. संदिप (आबा) सोमनाथ सातव**

## पत्ता

श्रीकृष्ण कुंज, श्री गणेश मंदिरासमोर,
गणेश नगर, वाघोली, ता. हवेली पुणे 412 207

## मोबाईल नंबर:

9890 59 1001

## कार्यालय

**वाघोली:** श्री. संदिप (आबा) सातव जनसेवा कार्यालय,
आव्हाळवाडी रोड, यागा डेअरी शेजारी, वाघोली.

**चंदननगर:** श्री. संदिप (आबा) सातव जनसेवा कार्यालय,
ऑफिस नंबर 305, समृद्धी मार्केट, संघर्ष चौक, चंदननगर.

**खराडी:** श्री. संदिप (आबा) सातव जनसेवा कार्यालय,
सर्वे नंबर- 22/1 लेन नंबर 8 थिटे वस्ती समर्थ हॉस्पिटल च्या समोर. खराडी

**खराडी:** श्री. संदिप (आबा) सातव जनसेवा कार्यालय,
दुर्वांकुर सोसायटी, दुकान क्रमांक A-36, विंग 1, अशोक नगर,
खराडी बायपास, शेल पेट्रोल पंपाच्या शेजारी, खराडी.

## राजकीय सामाजिक कारकिर्द

- सदस्य पुणे महानगर पालिका शा. नि. समिती
- सरचिटणीस भाजपा पुणे जिल्हा
- मा. जिल्हाध्यक्ष भाजपा युवा मोर्चा पुणे
- मा. उपसरपंच ग्रामपंचायत वाघोली
- मा. सदस्य ग्रामपंचायत वाघोली
- संस्थापक गणराज तरुण मंडळ

# परिचय पत्रक



## नाव

**सौ. रत्नमाला संदिप सातव**

## पत्ता

**श्रीकृष्ण कुंज, श्री गणेश मंदिरासमोर,**
**गणेश नगर, वाघोली, ता. हवेली पुणे 412 227**

## मोबाईल नंबर:

**84 2121 0039**

## कार्यालय

**वाघोली:** श्री. संदिप (आबा) सातव जनसेवा कार्यालय, आव्हाळवाडी रोड, यागा डेअरी शेजारी, वाघोली.

**चंदननगर:** श्री. संदिप (आबा) सातव जनसेवा कार्यालय, ऑफिस नंबर 305, समृद्धी मार्केट, संघर्ष चौक, चंदननगर.

**खराडी:** श्री. संदिप (आबा) सातव जनसेवा कार्यालय, सर्वे नंबर- 22/1 लेन नंबर 8 थिटे वस्ती समर्थ हॉस्पिटल च्या समोर. खराडी

**खराडी:** श्री. संदिप (आबा) सातव जनसेवा कार्यालय, दुर्वांकुर सोसायटी, दुकान क्रमांक A-36, विंग 1, अशोक नगर, खराडी बायपास, शेल पेट्रोल पंपाच्या शेजारी, खराडी.

## राजकीय सामाजिक कारकिर्द

नगरसेविका : पुणे महानगरपालिका
सदस्य : स्थायी समिति पुणे महानगरपालिका
संचालक नवनिर्माण ना. स. पतसंस्था
अध्यक्षा रत्नदीप सोशल फाउंडेशन
संचालक फिडोज फूड प्रा. ली.

# संदिप (आबा) सातव

## प्रत्येक पाऊल विकसित वाघोली खराडीकडे

### महिला सक्षमीकरण

Flea Market द्वारे उद्योजिकांना
संधीरांगोळी-मेहेंदी स्पर्धा 7 दिवस
लाडकी बहीण कार्यशाळा मध्ये
1000 पेक्षा जास्त महिलांचा सहभाग

### स्वच्छता व आरोग्य

क्लीन वाघोली
ग्रीन वाघोली अभियान
वृक्षारोपण उपक्रम
मोफत कोरोनालसीकरण

### प्रभू श्रीराम उद्यान

- एकूण ₹36 लाख निधी (ग्रामपंचायत व वयक्तिक)
- सांडपाणी सोडल्या जाणाऱ्या ठिकाणी नंदनवन
- ज्येष्ठ, महिला, मुलांसाठी निवांत ठिकाण

### ड्रेनेज लाईन

- **वॉर्ड 6 ड्रेनेज मुक्त**
- **आव्हाळवाडी-मुळामुठा 6 किमी मुख्य लाईन**
- **₹6.5 कोटी खर्च**

### रस्ते व ट्रॅफिक

- वर्षानुवर्षे प्रलंबित रस्ते पूर्ण
- PMC व ग्रामपंचायतचे कोट्यवधी निधी
- ट्रॅफिक कमी करण्यासाठी उपाययोजना

### बाजारतळ भाजी मंडई

- **प्रशस्त मंडई शेड व ओटे**
- **चिखलमुक्त खरेदी**
- **रोडवरचे ट्रॅफिक कमी**
- **शेतकरी थांबा**

### सामाजिक व धार्मिक उपक्रम

- श्री स्वामी समर्थ अध्ययन
- कन्याकुमारी, मदुराई, काशी अयोध्या यात्रा
- श्री राम नवमी शोभा यात्रा, गणेशोत्सव

### Wagholi Flea Nest

- **200+ स्टॉल्स**
- **20,000+ नागरिक उपस्थित**
- **महिला उद्योजिकांना व्यासपीठ**

### महिला क्रिकेट

- 53 संघांचा सहभाग
- 650+ महिला खेळाडू
- पहिली ऐतिहासिक स्पर्धा

### पाणी पुरवठा

- **PMRDA व भामा-आसखेड योजना**
- **ग्रामपंचायतीच्या माध्यमातून पाईपलाईन**



# संदिप (आबा) सातव

## आपला निष्ठावान सेवक

मी संदिप (आबा) सातव, वाघोलीचा एक निष्ठावान कार्यकर्ता, गेल्या 15 वर्षांहून अधिक काळापासून समाजसेवा आणि लोकहितासाठी झटतो आहे. शालेय व शैक्षणिक जीवनापासूनच सामाजिक बांधिलकी मनाशी बाळगली. बीजेएस कॉलेजमधून शिक्षण पूर्ण करून मी समाजकारणात पाऊल टाकलं आणि तेव्हापासून सेवा, संघर्ष, नियोजनबद्ध विकास आणि जनसंपर्क हेच माझं ध्येय राहिलं आहे.

**लोकसेवेची वाटचाल....**

- वाघोली ग्रामपंचायत सदस्य व उपसरपंच म्हणून काम करताना वॉर्ड क्र. 6 मध्ये 24 कोटींचा निधी आणून रस्ते, पाणी, ड्रेनेज, उद्यान, गॅस लाईन, भाजी मंडई शेड यांसह अनेक महत्त्वाच्या पायाभूत सुविधा निर्माण केल्या
- वाघोलीचा पुणे महानगरपालिकेत समावेश झाल्यानंतर शासन नियुक्त समितीवर सदस्य म्हणून निर्णायक भूमिका बजावली
- भाजप युवा मोर्चा, पुणे जिल्हाध्यक्ष या नात्याने उत्तर पुणे जिल्ह्यातील युवकांसाठी नोकरी, शिक्षण आणि पक्षाच्या कार्यकर्त्यांचे संघटन यासाठी योजनाबद्ध कार्य केलं.
- शाळा–कॉलेजच्या अतिरिक्त फीविरोधात आंदोलने करत विद्यार्थ्यांना न्याय मिळवून दिला.
- वाहतूक कोंडीसाठी उपाययोजना व अंमलबजावणी केल्या.
- प्रभू श्रीराम उद्यान, मूळा-मुठा नदीपर्यंत 6 किमी मुख्य व अंतर्गत ड्रेनेज लाईन, पाणी लाईन, दर्जेदार रस्ते, गॅस लाईन, भाजी मंडई शेड, अंतर्गत ड्रेनेज यंत्रणा आदी प्रकल्प यशस्वीपणे पूर्ण केले.

**रत्नदीप सोशल फाउंडेशनच्या अध्यक्षा सौ. रत्नमाला संदीप सातव यांच्या नेतृत्वाखाली:**

- Wagholi Women's Premier League -
  - सीजन 1: यामध्ये 53 संघांनी भाग घेतला तर 650 पेक्षा जास्त महिला खेळाडूंनी आपला सक्रिय सहभाग नोंदवला.
  - सीजन 2: वाघोली-खराडी वुमेन्स क्रिकेट प्रीमियर लीग- सीझन 2- 60 संघांचा सहभाग, 800 पेक्षा जास्त महिला खेळाडूंचा समावेश.
- Wagholi Flea Nest – 200 पेक्षा महिला उद्योजकांना हक्काचं व्यासपीठ उपलब्ध करूण दिले. 20 हजार पेक्षा जास्त नागरिकांनी या Fleaला भेट दिली.
- "लाडकी बहीण सक्षमीकरण मोफत कार्यशाळा" - 1000 पेक्षा जास्त महिलांचा सहभाग
- अनेक धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

गेली 15 वर्षांपेक्षा जास्त मी या आणि अशा अनेक कामातून समाजकारणात काम करत आहे. पुढे माझ्या या अहवालात आपल्याला सविस्तर पाहायला मिळेलच. आगामी काळात माझ्यावर जी जबाबदारी पडेल ती मी चोखपणे पार पाडेल. आपण सर्व नागरिकांनी एवढी वर्ष मला काम करण्याची संधी दिलीत त्याबद्दल आभारी आहे. **इथून पुढेही आपल्या भागाचा नियोजनबद्ध विकास करण्यासाठी मी 24 तास 365 दिवस काम करेल असा शब्द देतो.**



**सौ. रत्नमाला संदिप सातव**
नगरसेविका : पुणे महानगरपालिका
सदस्य : स्थायी समिति पुणे महानगरपालिका



**श्री. संदिप (आबा) सातव**
जिल्हा सरचिटणीसः भा.ज.पा. पुणे
सदस्यः पुणे मनपा शा.नि. समिती | मा. उपसरपंचः वाघोली



रयतेचं लोककल्याणकारी राज्य कसं असावं याचा आदर्श छत्रपती शिवाजी महाराजांनी संपूर्ण जगाला घालून दिला. त्यांचा हाच आदर्श डोळ्यासमोर ठेवून त्यांनी दाखवलेल्या मार्गानेच राजकारण आणि समाजकारण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न मी करत आलेलो आहे आणि पुढेही करत राहणार आहे.

**–संदिप आबा सातव**

• सरचिटणीस, भाजप पुणे जिल्हा

॥ धर्मो रक्षति रक्षितः ॥



प्रभु श्रीराम भक्त

# प्रभू श्रीराम उद्यान




प्रभू श्रीराम उद्यान हा एक ऐतिहासीक प्रकल्प आहे. गणेश नगर भागात ज्याठिकाणी अनेक वर्ष सांडपाणी, मल-मुत्र सोडले जात होते त्याठिकाणी आज **एका एकरात** प्रभू श्रीरामांच्या नावाने नंदनवन फुललं आहे. ग्रामपंचायत सदस्य, उपसरपंच पदावर असताना ग्रामपंचायतच्या माध्यमातून **16 लाख व वैयक्तिक 20 लाख रुपये खर्चून** अवघ्या एका वर्षात **"प्रभू श्रीराम उद्यान"** उभारले गेले. आता लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, माता-भगिनी यांच्यासाठी हे उद्यान एक आनंददायी निवांतस्थळ झाले आहे. लोकप्रतिनिधी म्हणून माझ्यासाठी हा खूप सुखावणारा क्षण आहे.



आधी

# प्रभू श्रीराम उद्यान






नंतर

# प्रभू श्रीराम उद्यान




















# जनसेवा कार्यालय उद्घाटन सोहळा




वाघोलीतील जनतेची निस्वार्थ सेवा हीच माझी खरी ओळख राहिली आहे. गेल्या अनेक वर्षांत तुमच्या आशीर्वादाने विविध जबाबदाऱ्या पार पाडण्याची संधी मला मिळाली. परंतु हीच सेवा अधिक प्रभावीपणे, सुसंगतपणे आणि तातडीने पोहोचवता यावी, नागरिकांना माझे कार्यालय हे आपल्या घरासारखे वाटावे, या उद्देशाने वाघोलीत **'जनसेवा कार्यालय'** स्थापन करण्याचा निर्णय घेतला. या कार्यालयाचे उद्घाटन **राज्याच्या कॅबिनेट मंत्री, आमच्या मार्गदर्शक मा. पंकजाताई मुंडे** यांच्या शुभहस्ते पार पडले. या जनसेवा कार्यालयातून **'जनतेच काम'** अधिक प्रभावीपणे करत राहिल.















# मुख्य ड्रेनेज लाईन

## एकूण निधी- 6 कोटी 50 लक्ष रुपये

### आव्हाळवाडी फाटा ते मुळा मुठा नदीपर्यंत



आव्हाळवाडी फाटा ते मुळामुठा नदी पर्यंत ड्रेनेज लाईन व गणेश नगर व सिध्दी पार्क विनायक पार्क ड्रेनेज लाईन भूमिपूजन



आव्हाळवाडी फाटा ते मुळामुठा नदी पर्यंत ड्रेनेज लाईन काम चालू असताना


वाघोलीमध्ये **वार्ड क्रमांक 6** मध्ये अनेक वर्ष ड्रेनेजचा विषय प्रलंबीत होता. रस्त्यावरुन वाहणाऱ्या सांडपाण्याने परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरत होती. ग्रामपंचायत सदस्य म्हणून निवडणून आल्यानंतर मनाशी पक्का निश्चय केला होता की वार्ड क्रमांक 6 सुजलाम-सुफलाम करायचा. या अनुषंगाने आव्हाळवाडी फाटा ते मुळा-मुठा नदी अशी **6 किमी लांबीची 6 कोटी 50 लक्ष** रुपयांची ड्रेनेज लाईन केली. त्याला आव्हाळवाडी रोड, डोमखेल रोड, केसनंद रोड, काळूबाई नगर, शांती पार्क, जे. जे नगर, अनुसया पार्क, सरकारी दवाखाना परिसर, गणेश नगर, शिवतेज पार्क, विनायक पार्क, सिद्धी पार्क, काळुबाई नगर, काळे ओढा, बालाजी पार्क, बालाजी विहार, गोल्डन सोसायटी, ऑक्सी अल्टिमा रोड, समर्थ पार्क, इकाई सोसायटी, साईराज पार्क, सत्यनारायण पार्क वरील सर्व सोसायटी या भागातील अनेक अंतर्गत लाईन जोडण्यात आल्या. हे काम आमच्या दृष्टीने **ऐतिहासीक काम** आहे, कारण वाघोली मधील 6 नंबरवार्ड हा एकमेक असा वार्ड आहे ज्याची ड्रेनेज लाईन नदीपर्यंत नेली आहे.



# मुख्य ड्रेनेज लाईन




## आव्हाळवाडी फाटा ते मुळा मुठा नदीपर्यंत









### उर्वरित ड्रेनेजचे काम पुढील महिन्यात सुरु होणार

ग्रा.पं. सदस्य संदीप सातव यांची माहिती; वार्ड सहा मधील ड्रेनेजचा प्रश्न लागणार मार्गी



**वाघोली : प्रतिनिधी**

आव्हाळवाडी फाटा ते मुळा-मुठा नदीपर्यंत चालू असलेल्या ड्रेनेज लाईनच्या कामाला केसनंद रोड वरील सर्व सोसायटीचे कमिटी मेंबर यांनी रविवार (दि.२८) रोजी भेट देऊन पाहणी केली.

ड्रेनेज लाईन करताना समस्या व अडचणी निर्माण झाल्या होत्या. परंतु सर्व पक्षीय नेते, शेतकरी व नागरिक यांच्या सहकार्याने ड्रेनेजच्या लाईनचे काम पूर्णत्वास आले असल्याचे माजी उपसरपंच संदीप सातव यांनी सांगितले. केसनंद रोड ते आव्हाळवाडी रोड ड्रेनेज लाईनचे उर्वरित शंभर मीटरचे काम पुढील महिन्यात चालू होणार आहे. लवकरच ड्रेनेज लाईनचे काम पूर्ण होणार असल्यामुळे वार्ड सहा मधील ड्रेनेजचा प्रश्न मार्गी लागणार आहे.

### ड्रेनेज लाईनच्या कामाचा नागरिकांनी प्रत्यक्ष घेतला आढावा



**वाघोली : प्रतिनिधी**

वाघोली परिसरामध्ये ड्रेनेज लाईनच्या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी ग्रामपंचायतीच्या वतीने आव्हाळवाडी फाटा ते मुळामुठा नदीपर्यंत करण्यात येणाऱ्या ड्रेनेज लाईनच्या कामाचा आढावा वाघोलीतील नागरिकांनी घेतला.

सोसायटी परिसरातील अनेक नागरिक यामध्ये सहभागी झाले होते. ड्रेनेजलाईन करताना आलेल्या अडचणी व सर्व पक्षीय नेते, शेतकऱ्यांनी, नागरिकांनी केलेले सहकार्य, कामाच्या स्वरूपाबाबतची माहिती ग्रामपंचायत सदस्य संदीप सातव यांनी उपस्थित नागरिकांना दिली. ड्रेनेजलाईनचे १५० मीटर काम बाकी असून लवकरच काम पूर्ण करण्यात येईल असे सातव यांनी सांगितले.

### आव्हाळवाडी फाटा ते मुळा मुठा नदी पर्यंत ड्रेनेज लाईनचे थांबलेले काम पुन्हा सुरु

ग्रामपंचायत सदस्य संदीप सातव यांची माहिती



> एकूण सहा किलोमीटर पैकी चार किलोमीटर लाईनचे काम स्थानिक शेतकऱ्यांच्या वैयक्तिक जागेतून जात होते. स्थानिक शेतकरी, आव्हाळवाडी ग्रापंचायत, गावातील आजी माजी पदाधिकाऱ्यांच्या मदतीने सदरचे काम पूर्णत्वाच्या दिशेने गेले आहे. अवघे ४५० मीटर राहिलेले काम पावसाळा सुरु होण्यापूर्वी करण्यात येईल.
>
> - संदीप सातव
>
> (ग्रा. पं. सदस्य, वाघोली)

**वाघोली : प्रतिनिधी**

आव्हाळवाडी फाटा ते मुळा मुठा नदीपर्यंत वाघोली ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात येणाऱ्या ड्रेनेज लाईनचे कोरोना परिस्थितीमुळे थांबलेले काम पुन्हा सुरु करण्यात आले असल्याची माहिती ग्रामपंचायत सदस्य संदीप सातव यांनी दिली.

वाघोलीतील (ता. हवेली) बहुतांश परिसरातील ड्रेनेजची समस्या सोडविण्यासाठी वाघोली ग्रामपंचायतीच्या वतीने ६ कोटी ५० लाख रुपये निधी खर्च करून आव्हाळवाडी फाटा ते मुळा मुठा नदीपर्यंत ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम केले जात आहे.

एकूण सहा किलोमीटर पैकी ४५० मीटर लाईन टाकण्याचे काम बाकी असून पुढील काही दिवसांमध्ये पावसाळा सुरु होणार असल्याने जिल्हाधिकारी यांच्या परवानगीने काम चालू करण्यात आले आहे. पावसाळ्यात काम करणे शक्य होणार नसल्याने कोरोना परिस्थितीमुळे थांबलेले काम अगोदरच सुरु करण्यात आले आहे. पावसाळ्याच्या अगोदर पुढील एक महिन्यामध्ये काम पूर्ण केले जाणार असल्याचे संदीप सातव यांनी सांगितले.








अंतर्गत ड्रेनेज
शहराचा
शाश्वत आणि नियोजनबध्द विकास
करण्यासाठी 'व्हिजन' असावं...!

# डोमखेल रोड परिसर




अंतर्गत ड्रेनेज लाईनमध्ये डोमखेल रोडवरील **गणेश नगर लेन नं. 1 ते 6 , अनुसया पार्क, गणराज पार्क, जेल सोसायटी, ऑक्सी ईवॉल्व सोसायटी, रेनबो सोसायटी, शिवतेज पार्क, रायसोनी कॉलेज** जवळील संपूर्ण भाग सर्व लेन या मुख्य ड्रेनेज लाईनला जोडण्यात आल्याने हे भाग सांडपाणी मुक्त झाले.

| विकासकामे | निधी |
|---|---|
| गणेशनगर गल्ली नं. 1 ते 6 अंतर्गत ड्रेनेजलाईन करणे | 46,87,444/- |
| अनुसया पार्क ते आव्हाळवाडी रोड ड्रेनेज लाईन करणे | 12,21,711/- |
| डोमखेल रोड ड्रेनेज लाईन टाकणे | 2,99,116/- |
| शिवतेज पार्क लेन नं.3 व 5 ड्रेनेज लाईन करणे | 16,61,344/- |
| जेल सोसायटी अंतर्गत ड्रेनेज लाईन करणे | 2,65,323/- |
| ऑक्सी इवॉल्व्ह वे ते आव्हाळवाडी रोड भूमिगत गटर करणे | 13,60,797/- |
| शिवतेज पार्क ते पिराजिस कंपनी ते आव्हाळवाडी रोड भूमिगत गटर बांधणे | 9,68,173/- |
| डोमखेल रोड ते तारातरंग सोसायटी ड्रेनेज लाईन करणे | 2,99,760/- |
| सरकारी दवाखान्यामागील (अनुसाया पार्क) ड्रेनेज लाईन करणे | 2,66,685/- |
| रेनबोग्लोरी ते डोमखेल रोड ड्रेनेज लाईन करणे | 4,21,839/- |
| रायसोनी कॉलेज ते सचिन सातव घर पर्यंत बंदिस्त गटर करणे | 50,83,940/- |







# आव्हाळवाडी रोड परिसर




आव्हाळवाडी रोड वरून जाताना **विनायक पार्क, सिद्धी पार्क, बजरंग नगर, कैलास बापू सातव यांचे घर ते आव्हाळवाडी रोड, रोझवूड पार्क सोसायटी, उत्सव सोसायटी, इको हाईड सोसायटी, ब्लिथ आयकॉन सोसायटी, कोझी होम्स, हॅप्पी होम, ज्युबिलीशीयन सोसायटी, ग्रँड व्हॅनिला सोसायटी** असे भाग आहेत. या भागात हजारो नागरिक राहण्यास आहेत. परंतु ड्रेनेजची समस्या ही फार मोठी होती, हे भाग देखील मुख्य लाईनला जोडून घेतले.

| विकासकामे | निधी |
|---|---|
| सिध्दीपार्क अंतर्गत ड्रेनेजलाईन | 39,51,425/- |
| गणेशनगर आव्हाळवाडी रोड ते गणेश हाईट भुमिगत गटर लाईन करणे | 6,25,028/- |
| साईराज पार्क ते आव्हाळवाडी रोड भुमिगत गटर करणे | 18,01,931/- |
| कैलास बापु सातव घर ते आव्हाळवाडी रोड भुमिगत गटर करणे | 16,11,627/- |
| इंकाई सोसायटी येथे भमिगत गटर करणे | 6,98,359/- |
| बाजारतळ ते आव्हाळवाडी रोड ड्रेनेज लाईन करणे | 1,74,295/- |
| बाजारतळ शेड ते जुनी ड्रेनेज लाईन पर्यंत लाईन करणे | 1,75,555/- |
| बजरंग नगर अंतर्गत ड्रेनेज लाईन करणे | 11,00,000/- |
| नवनाथ सातव यांचे घर (गाडीतळ) ते आव्हाळवाडी रोड ड्रेनेज लाईन करणे | 2,61,440/- |
| साईराज पार्क अंतर्गत ड्रेनेज लाईन करणे | 18,01,931/- |





**वाघोली-आव्हाळवाडी रोडवरील बजरंग नगर परिसरातील ड्रेनेज लाईनच्या कामाला वेग**

संदीप सातव यांच्या पाठपुराव्यामुळे ड्रेनेजचा प्रश्न मार्गी

वाघोली : प्रतिनिधी

वाघोली-आव्हाळवाडी रोडवरील बजरंग नगर परिसरातील नागरिकांना गेल्या अनेक दिवसांपासून ड्रेनेज समस्येला सामोरे जावे लागत होते. भाजप युवा मोर्चा पुणे जिल्हाध्यक्ष संदीप सातव यांनी गांभीयनि समस्येची दखल घेत सातत्याने प्रशासनाकडे पाठपुरावा केल्यानंतर अखेर ड्रेनेज लाईनच्या कामाला सुरुवात झाली आहे. काम सुरु झाल्याने बजरंग नगर येथील रहिवाशांमधून समाधान व्यक्त केल्या जात आहे.

ड्रेनेज लाईनमुळे बजरंग नगर परिसरातील नागरिकांची गैरसोय दूर होणार असून, स्वच्छतेच्या दृष्टीनेही हा महत्त्वाचा प्रश्न मार्गी लागला आहे. प्रशासनाच्या संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांनी कामासाठी सहकार्य केले असून, स्थानिक रहिवाशांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याने काम लवकर पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे भाजप युवा मोर्चा पुणे जिल्हाध्यक्ष संदीप सातव यांनी सांगितले.

आव्हाळवाडी रोडवरील बजरंग नगर परिसरात सुरु असलेले ड्रेनेज लाईनचे काम



# केसनंद रोड परिसर




केसनंद रोड वरील **हिलशायर सोसायटी ते गणेश रेसिडेंसी** पर्यंत मुख्य लाइन केली. केसनंद रोड हा मोठा रहदारीचा रस्ता. केसनंद गावात जाण्यासाठी हाच रस्ता वापरला जातो. येथे देखील हजारो नागरिक राहण्यास आहेत. मग त्यामध्ये **काळे ओढा, शांती पार्क, समर्थ पार्क, कारिया सोसायटी, ऑर्चिड सोसायटी, इपिक सोसायटी राधिका विहार, साई रेसिडेंसी, साईराज पार्क 2, सत्यनारायण पार्क, बालाजी विहार 1-2, बालाजी पार्क, गोल्डन सोसायटी** असे भाग येतात हे देखील सर्व भाग मुख्य लाईन ला जोडून घेतले.

| विकासकामे | निधी |
|---|---|
| हिलशायर ते ऑक्सी अल्टीमा येथे बंदिस्त गटर बांधणे | 81,52,801/- |
| नगर रोड ते श्रेयेश कार्यालय ते केसनंद रोड अंतर्गत ड्रनेज लाईन टाकणे | 4,01,774/- |
| बालाजी विहार लेन नं. 1 व 2 येथे बंदिस्त गटर | 27,74,066/- |
| गोल्डन सोसायटी बंदिस्त गटर करणे | 14,72,111/- |
| केसनंद रोड, बालाजीपार्क, ऑक्सी अल्टीमा, शिवाली कंपनी रस्ता, व्हिक्टीरी स्कुल एरिया ड्रेनेज लाईन करणे | 1,05,34,100/- |







# काळूबाई नगर




काळूबाई नगर मधील **लेन नं. 1 ते 4, शांती पार्क, लुंकड ब्लॉसम, स्वामी समर्थ सोसायटी** या सर्व भागात अनेक वर्ष सांडपाणी रस्त्यावरुन वाहत होते, याचा नागरिकांना प्रचंड त्रास होत होता. हे देखील भाग मुख्य लाईनशी जोडून घेतले आणि काळूबाई नगर आणि आजूबाजूचा भाग ड्रेनेज मुक्त केला.

| विकासकामे | निधी |
|---|---|
| काळुबाईनगर ड्रेनेज लाईन करणे | 49,42,866/- |
| शांती पार्क ते इपिक सोसायटी (गायत्री पार्क) ड्रेनेज लाईन करणे | 14,65,500/- |

## वार्ड सहा मधील ड्रेनेज लाईनचे काम सुरु

**अनेक सोसायट्यांचा जिव्हाळ्याचा प्रश्न लागणार मार्गी**

**वाघोली : प्रतिनिधी**

वाघोली (ता. हवेली) येथील वार्ड क्रमांक ६ मधील ड्रेनेज लाईनच्या कामाला सुरुवात झाली असून लवकरच हे काम मार्गी लागणार आहे. ड्रेनेजची समस्या सुटणार असल्यामुळे येथील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

वार्ड क्रमांक ६ मधील शांती पार्क, लुंकड ब्लॉसम सोसायटी, स्वामी समर्थ सोसायटी, प्रयोग धाम सोसायटी, गायत्री पार्क या भागातील ड्रेनेज लाईनचे काम सुरु झाले आहे. अनेक वर्षांपासून ड्रेनेज लाईन अभावी मोठा त्रास सहन करावा लागत आहे. परंतु ग्रामपंचायत सदस्य संदीप सातव, मालती गोगावले, जयश्री काळे यांनी ग्राम निधीमधून ड्रेनेज लाईनचे काम सुरु केल्यामुळे अनेक सोसायट्यांचा जिव्हाळ्याचा प्रश्न मार्गी लागणार आहे. वार्ड सहा मधील अंतर्गत रस्ते काँक्रीटीकरण, स्ट्रीट लाईट आदि मुलभूत समस्या मार्गी लागल्या असल्याचे संदीप सातव यांनी सांगितले.





## काळूबाई नगर मधील ड्रेनेजच्या कामाला सुरुवात

### माजी उपसरपंच संदीप सातव यांची माहिती

**वाघोली : प्रतिनिधी**

वाघोली येथील काळूबाई नगर मधील उर्वरित ड्रेनेजचे काम सुरु करण्यात आले आहे. त्यामुळे येथील रहिवाशांचा ड्रेनेजचा प्रश्न लवकरच मार्गी लागणार असल्याची माहिती माजी उपसरपंच संदीप सातव यांनी दिली.

वाघोलीतील काळूबाई नगर मधील ड्रेनेजचे काम करण्यात आले होते. परंतु काही काम करणे बाकी राहिले होते. त्यामुळे मागील दीड महिन्यांपासून रस्त्यावर दुर्गंधीयुक्त पाणी रस्त्यावर साचत असल्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात



आले होते. याबाबत येथील महिलांनी संताप व्यक्त करत तात्काळ दुर्गंधीयुक्त पाण्याची विल्हेवाट लावावी अशी मागणी केली होती. त्यांच्या मागणीची तात्काळ दखल घेऊन बाळासाहेब सातव (सर), माजी उपसरपंच संदीप सातव, राजू सातव, पप्पू सातव यांच्या पुढाकाराने त्याच दिवशी ड्रेनेजच्या कामाला सुरुवात करण्यात आली.

रस्त्यावरील साचलेल्या पाण्यामुळे नागरिकांना होत असलेला त्रास लक्षात घेता बाळासाहेब सातव (सर), पप्पू सातव, राजूशेठ सातव यांच्या स्वतःच्या मालकीच्या जागेत ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी परवानगी दिल्याबद्दल काळूबाई नगर येथील नागरिकांनी आभार मानले. ड्रेनेज लाईनचे काम चालू करण्यात आले असून आठ दिवसांमध्ये मार्गी लागला असल्यामुळे येथील रहिवाशांचा प्रश्न कायमस्वरूपी सुटणार असल्याची माहिती संदीप सातव यांनी दिली.

# वाघोली पोलीस स्टेशन पाठपुरावा




## निधी - 8 कोटी 75 लक्ष


तत्कालीन उपमुख्यमंत्री आणि आताचे लाडके मुख्यमंत्री मा.ना. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांना वाघोलीत वाढत्या लोकसंख्येचा विचार करून आणि वाढती गुन्हेगारी व कायदा- सुव्यवस्था राखण्याच्यादृष्टीने वाघोलीमध्ये नवीन पोलीस स्टेशन कार्यरत करण्यासाठी **4 ऑगस्ट 2023** रोजी मंत्रालय मुंबई येथे भेटून निवेदन दिले होते.

निवेदनात पायाभूत सुविधा, त्यासाठी अपेक्षित खर्चाची तरतूद आणि पोलीस ठाण्यांची रचना, हद्द, मनुष्यबळ, वाहने तरतूद करून निधी उपलब्ध करण्याची मागणी **गृहमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब** यांच्याकडे करण्यात आली होती. त्यावेळी लवकर वाघोलीला स्वतंत्र पोलीस स्टेशन होईल मिळेल असे आश्वासन मा. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी दिले होते.

1 **नोव्हेंबर 2023** रोजी पुणे पोलीस आयुक्त यांनी वाघोली स्वतंत्र पोलीस स्टेशन करण्याबाबत राज्य शासनाला प्रस्ताव पाठवला होता. राज्य शासनाने अंतिम प्रशासकीय मान्यता देऊन वाघोली पोलीस स्टेशनसाठी **8 कोटी 75 लाख रुपये निधी** मंजूर केला. आता आपण पाहतो वाघोलीमध्ये प्रशस्त पोलीस स्टेशन उभे राहिले आहे. हा स्वागतार्ह निर्णय घेतल्याबद्दल तत्कालीन मुख्यमंत्री मा. एकनाथभाई शिंदे, उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे मनापासून आभार.



गृहमंत्री फडणवीस साहेबांना निवेदन देताना.



संदिप सोमनाथ सातव

दिनांक : 03/08/23

मा. नामदार देवेंद्रजी फडणवीस साहेब


उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य

गृहमंत्री महाराष्ट्र राज्य

विषय - मौजे वाघोली तालुका हवेली जिल्हा पुणे या नवीन मंजूर पोलिस स्टेशनला पायाभूत सुविधा, त्यासाठी अपेक्षित खर्चाची तरतूद आणि पोलिस ठाण्यांची रचना, हद्द, मनुष्यबळ,वाहने तरतूद करून पोलीस स्टेशन चालू करण्यात बाबत

आदरणीय साहेब,

मौजे वाघोली तालुका हवेली जिल्हा पुणे हे पुणे महानगर पालिकेत नव्याने समाविष्ट करून दोन वर्ष झाले असून वाघोली लोकसंख्या सुमारे तीन लाख असून वाढते शहरीकरण लक्षात घेऊन तसेच यागावाची वाढत्या लोकसंख्येच्या दृष्टीकोनातून गुन्हेगारी याचा विचार करून पुणे शहर आयुक्तालय अंतर्गत असणारे लोणीकंद पोलीस ठाण्यांच्या विभाजनाला मान्यता देण्यात आली. यामध्ये कायदा-सुव्यवस्था राखण्याच्यादृष्टीने वाघोली नवीन पोलीस ठाण्यांना मंजूरी देण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या बैठकीत घेण्यात आला



संदिप सोमनाथ सातव


दिनांक : 03/08/23

वाघोली येथे जागा उपलब्ध असून या जागेमध्ये लोणीकंद पोलीस स्टेशनच्या अंतर्गत पोलीस चौकी कार्यरत आहे. वाघोली गावच्या ग्रामसभेमध्ये पोलीस स्टेशन साठी वीस गुंठ्याची जागेची मान्यता देण्यात आली होती.पोलिस स्टेशनसाठी जागा उपलब्ध आहे.परंतु आवश्यक मनुष्यबळ, पायाभूत सुविधा, त्यासाठी अपेक्षित खर्चाची तरतूद आणि पोलिस स्टेशन रचना, हद्द यासंबंधीचा सविस्तर प्रस्ताव करून कागदोपत्री मान्यतेसाठी राज्य सरकारकडे पाठविला आहे. सदर प्रस्ताव प्रलंबित असून त्यास अद्याप मान्यता मिळालेली नाही.वाघोली नवीन पोलिस स्टेशन अद्याप कागदावरच आहेत. वाघोली उपनगरांत वाढत्या लोकसंख्येच्या दृष्टीकोनातून व वाढत्या गुन्हेगारी याचा विचार करून वाघोली पोलीस स्टेशनसाठी पायाभूत सुविधा, त्यासाठी अपेक्षित खर्चाची तरतूद आणि पोलिस ठाण्यांची रचना, हद्द, मनुष्यबळ,वाहने तरतूद करून वाघोली पोलीस स्टेशन चालू करण्यात यावे ही नम्र विनंती

कळावे

आपला कृपाभिलाषी

गृहमंत्री फडणवीस साहेबांना दिलेले पत्र .



पोलीस आयुक्तांचे मंजूरी पत्र.



पुणे जिल्हा

प्रभात पुणे, शुक्रवार, दि. ४ ऑगस्ट २०२३

### वाघोली पोलीस ठाणे कार्यान्वित करा

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना संदीप सातव यांचे निवेदन

वाघोली, दि. ३ (प्रतिनिधी) - वाघोलीत वाढत्या लोकसंख्येच्या दृष्टीकोनातून गुन्हेगारी व कायदा-सुव्यवस्था राखण्याच्यादृष्टीने वाघोली नवीन पोलीस स्टेशनला मंजूरी देण्यात आली आहे. तातडीने पोलीस ठाणे कार्यान्वित करण्याची मागणी संदीप सातव यांनी निवेदनाद्वारे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

संदीप सातव यांनी सांगितले की, वाघोली उपनगरांत वाढत्या लोकसंख्येच्या दृष्टीकोनातून व वाढत्या गुन्हेगारी याचा विचार करून वाघोली पोलीस स्टेशनसाठी पायाभूत सुविधा, त्यासाठी अपेक्षित खर्चाची तरतूद आणि पोलिस ठाण्यांची रचना, हद्द, मनुष्यबळ, वाहने तरतूद करण्याची मागणी नामदार देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे करण्यात आली असून लवकर स्वतंत्र वाघोली पोलीस स्टेशन होईल असे आश्वासन उपमुख्यमंत्र्यांनी संदीप सातव व केसनंदचे सरपंच दत्तात्रय हरगुडे यांना दिले आहे. यावेळी सरपंच हरगुडे यांनी केसनंदच्या विविध विकासकामांचे निवेदन देऊन उपमुख्यमंत्र्यांशी चर्चा केली आहे.

पुणे : उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करताना संदीप सातव.



Gramin_12 Oct 2024_017
12 Oct 2024

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com

### वाघोली पोलीस ठाण्याचे उद्घाटन

नागरिकांकडून पोलीस अधिकाऱ्यांचा सत्कार करून स्वागत




वाघोली पोलीस स्टेशन उद्घाटन सोहळा.

चांगला रस्ता म्हणजे
चांगल्या भविष्याचा मार्ग!

# मुख्य रस्ते




# वाघोली ते केसनंद





## निधी - 1 कोटी 80 लक्ष रुपये

वाघोली परिसरातील विकासाच्या दृष्टीने वाघोली ते केसनंद रस्ता होणे अतिशय गरजेचे होते. अनेक गृहनिर्माण प्रकल्प, हजारो नागरिक, व्यावसायीक या रस्त्यावर अवलंबून होते. गेली **अनेक वर्ष** हा रस्त्याचा विषय प्रलंबीत होता. सार्वजनिक बांधकाम (PWD) विभागाकडे रस्त्याच्या कामाविषयी पाठपुरावा केला परंतु अधिकारी वर्ग विषय गांभिर्याने घेत नव्हते, अशा वेळी पर्याय उरतो तो आंदोलनाचा. **वाघोली-केसनंद रोडसाठी रस्त्यावर उतरून आंदोलन केले, बांधकाम विभाग, मंत्री यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला.** मोठ्या संघर्षनंतर या लढ्याला यश आले आणि वाघोली- केसनंद रस्त्याचा विषय मार्गी लागला.







GOVT. OF MAHARASHTRA
Public Works (South) Division, Pune - 411 001
Phone No. 020/26121765
Web- www.mahapwd.com & e-mail- integratedpune.ee@mahapwd.com

E-TENDER NOTICE NO. 21 FOR 2020-2021(Short Period)

The Executive Engineer, Public Works (South) Division, Pune - 411 001 invites bids for following work from Registered as well as unregistered Contractor, and full filling the qualifying criteria in B-1 ~~& C Tender~~ Format as per Maharashtra Government, Public Work Department G.R. No. CAT/2017/Pra.Kra-08/Bldg-2, dt. 27/9/2018 and Public Work Deparment Matralaya Mumbai Circular No. CAT/2017/Pra.Kra-08/Bldg-2, dt. 22/10/2018 & 19/01/2021

Bids document can be downloaded from website https://mahatenders.gov.inExecutive Engineer reserves all rights to accept or reject bids. Conditional bids will not be accepted.

NAME OF WORK AND ESTIMATE COST LIST

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 3. | Improvements of Kalas Lohgaon Wagholi kesnand Rahu SH-68 km 14/500 to 16/00 (length Passing Through Residential) Tal Haveli Dist.Pune) **(Budget 5054 03)** | **200.00** | 1,50,000/- | 12 Months (Including Monsoon) | Rs. 1120/- (With GST 12%) | Registered as well as unregistered Contractor |
| 4. | Improvements of Kalas Lohgaon Wagholi Kesnand Rahu SH-68 Km 19/000 to 22/00 (Length passing through Residential) Tal.Haveli, Dsit.Pune **(Budget 5054 03)** | **300.00** | 1,50,000/- | 12 Months (Including Monsoon) | Rs. 2240/- (With GST 12%) | Registered as well as unregistered Contractor |
| 5. | Improvements Of Kalas Lohgan Wagholi Kesnand Rahu SH-68 Km 22/2000 to 24/600(length Passing Through Residential ) Tal.Haveli, Dist.Pune. **(Budget 5054 03)** | **350.00** | 1,75,000/- | 12 Months (Including Monsoon) | Rs. 2240/- (With GST 12%) | Registered as well as unregistered Contractor |

वाघोली केसनंद रस्ता पूर्ण



# वाघोली ते आव्हाळवाडी रोड




## निधी- 1 कोटी 50 लक्ष रुपये

वाघोली-आव्हाळवाडी रस्ता हा वाघोलीसाठी महत्त्वाचा मुख्य रस्ता... आजूबाजूच्या अनेक गावांना हा रस्ता जोडतो, विषेश म्हणजे सोलापूर रोड आणि नगर रोड या **दोन मुख्य राज्य महामार्गांना जोडणारा हा रस्ता** आहे, हा रस्ता चांगल्या प्रकारचा होणे अतिशय गरजेचे होते. अनेक सोसायटी, गृहनिर्माण प्रकल्प या रस्त्यावर आहेत. सदस्य/उपसरपंच असताना ग्रामपंचायतच्या माध्यमातून या रस्त्यासाठी **1 कोटी 50 लक्ष** रुपयांचा निधी मंजूर करून घेतला आणि प्रत्यक्षात काम देखील पूर्ण करून घेतले. याचबरोबर **आव्हाळवाडी चौक** देखील मोठा करण्यात आला, यामुळे चौकामध्ये होणारी **वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी झाली.**



**उद्घाटन शुभहस्ते:**
मा. पालकमंत्री स्व. गिरीशजी बापट साहेब व
मा. आमदार स्व. बाबूराव पाचर्णे



आव्हाळवाडी फाटा रुंदीकरण पाहणी



आव्हाळवाडी चौक मोठा केला.



वाघोली आव्हाळवाडी रस्त्याच्या कामाला सुरुवात



# दत्त मंदिर - केसनंद रोड व शांती पार्क चौक




## निधी- 1 कोटी 6 लक्ष रुपये

वाघोलीतील **बस स्टॅप मागील रस्ता (निधी 50 लक्ष)** हा अनेक वर्ष खड्डेमय होता. हा रस्ता **आव्हाळवाडी रोड आणि केसनंद रोड** या दोन मुख्य रस्त्याला जोडणार होता. याचबरोबर काळूबाई नगर सर्व लेन या रस्त्याने जोडल्या जाणार होत्या, त्यामुळे हा रस्ता होणे अतिशय गरजेचे होते. तसेच **शांती पार्कचा रस्ता (56 लक्ष)** हा केसंनद रोडला जोडला जाणारा रस्ता होता. दोन्ही रस्त्यांचे काम झाल्याने **बस स्टॅप आणि शांती पार्क यांच्यामधील चौक मोठा** होण्याला मदत झाली. हे दोन्ही रस्ते झाल्याने वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढली आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळाला.

| विकासकामे | निधी |
|---|---|
| बस स्टॅप मागील रस्ता | 50,00000/- |
| शांती पार्क ते ऑक्सी व्हॅली सोसायटी रस्ता करणे | 56,00,000/- |



**केसनंद फाट्याजवळचा शांती चौक होणार मोठा**

**पुणे मनपा, पीएमपीएल विभागाच्या अधिकाऱ्यांनी स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांच्या उपस्थितीत केली पाहणी**

वाघोली : प्रतिनिधी

वाघोली-केसनंद रस्त्यावरील वाघोली बीआरटी बस स्थानक ते शांती चौकामध्ये होणारी वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी शांती पार्क चौकामध्ये बीआरटीचे कंपाउंड, व अतिक्रमणे काढून चौक मोठा करण्याबाबत मनपा पथ विभागाचे उप अभियंता मकरंद वाडेकर, कनिष्ठ अभियंता सुशील चोरडे, पीएमपीएलचे व्यवस्थापक वाघोले यांनी मनपा शासन नियुक्त नगरसेवक शांताराम कटके, भाजप युवा मोर्चा पुणे जिल्हाध्यक्ष संदीप सातव, वाघोली वाहतूक शाखेचे सहा. पोलीस निरीक्षक गजानन जाधव, अजीद शेख व ग्रामस्थांच्या उपस्थितीत पाहणी केली. लवकरच चौक मोठा करून वाहतूक समस्या सोडवण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे शांताराम कटके यांनी सांगितले.

काही दिवसांपूर्वीच पीएमपीएमएलच्या अध्यक्षा दीपा मुधोळ-मुंडे यांनी पाहणी केली होती. सार्वजनिक बांधकाम विभाग व पुणे महानगरपालिका यांच्या सहकार्यातून रस्ता रुंदीकरण करून तातडीने कोंडीचा प्रश्न सोडवणार असल्याचे सांगितले होते. त्यानंतर पुन्हा एकदा स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांच्या उपस्थितीत पीएमसी पथ विभागाचे उपअभियंता, कनिष्ठ अभियंता, पीएमपीएलचे व्यवस्थापक यांनी पाहणी केल्याने कामाला गती मिळणार आहे.

केसनंद रस्त्यावर व शांती पार्क चौकात वारंवार होत असलेल्या वाहतूक कोंडीमुळे नागरिकांना नाहक मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे शांती पार्क चौकामध्ये बीआरटीचे कंपाउंड, व अतिक्रमणे काढून चौक मोठा करण्यासाठी पाहणी करण्यात आली.

पुणे महापालिकेकडून रस्ता रुंदीकरणाचे काम चालू आहे. शांती पार्क चौकात वाहतूक कोंडी सातत्याने होत आहे. संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून चौक मोठा करण्यासाठी पीएमपीएल प्रशासनाकडून संरक्षण जाळ्या काढून घेण्यात येतील. त्यामुळे कोंडीचा प्रश्न मार्गी लागेल. - संदीप सातव (पुणे जिल्हाध्यक्ष, भाजप युवा मोर्चा)





शांती पार्क चौकामध्ये बीआरटी चे कंपाउंड काढून चौक मोठा करवा यासाठी PMPML च्या अध्यक्षा आणि व्यवस्थापकीय संचालक दिपा मुधोळ–मुंडे यांच्यासह पाहणी







शांती पार्क चौक मोठा करण्यात आला

विकास हा केवळ
आश्वासनांमध्ये नसतो,
तो कृतीतून दिसतो !

# अंतर्गत रस्ते



# आव्हाळवाडी रोड परिसर




## एकूण निधी – 96 लाख

वाघोली-आव्हाळवाडी रस्ता हा प्रचंड रहदारीचा रस्ता. इथून **आव्हाळवाडी, कोलवडी, सोलापूर** हायवेकडे जाणारी वाहतूक मोठ्या प्रमाणात आहे. त्याचबरोबर **विनायक पार्क, सिद्धी पार्क, दत्ता मंदिर, उत्सव सोसायटी, इको हाईड सोसायटी,ब्लिथ आयकॉन सोसायटी, कोझी होम्स, हॅप्पी होम, जुबली शेम सोसयटी, ग्रँड व्हॅनिला सोसयटी, एपिक सोसायटी** या भागामध्ये हजारो लोक राहतात अनेक वर्ष चांगला रस्ता नव्हता. ग्रामपंचायतच्या माध्यमातून या रस्त्याचा विषय मार्गी लावला

| विकासकामे | निधी |
|---|---|
| विनायक पार्क अंतर्गत रस्ता करणे | 10,09,790/- |
| रोजवुड पार्क (अमित काळे घर) ते आव्हाळवाडी रोड रस्ता करणे. | 25,71,669/- |
| मदर मेरी सोसा. ते राजेंद्र थीटे घर रस्ता करणे | 26,00,275/- |
| सिद्धी पार्क ते ईको हाईट रस्ता करणे | 20,00,000/- |
| आव्हाळवाडी रोड पेव्हिंग ब्लॉक | 2,66,434/- |
| मदरमेरी सोसायटी अंतर्गत रस्ता करणे | 10,69,241/- |






रोजवूड पार्क ते आव्हळवाडी रोड रस्ता - चौक मोठा केला

# आव्हाळवाडी रोड परिसर















# गणेश नगर, अनुसया पार्क परिसर




## निधी- 2 कोटी

गणेश नगर भागातील ड्रेनेजचा प्रश्न तर मार्गी लागलाच तसेच **सर्व लेनमधील रस्ते काँक्रिटचे झाले.** तसेच गणेश नगर मधील **प्रभू श्री राम उद्यान आणि आव्हाळवाडी रोडला** जोडणारा रस्ता देखील झाला. गणेश नगर परिसरातील **अनुसया पार्क,गणराज पार्क, जेल सोसायटी, एकाई सोसायटी, साईराज पार्क, आदर्श सोसायटी** भागामध्ये सुसज्ज असे काँक्रिटचे रस्ते ग्रामपंचायतच्या माध्यमातून केले.

| विकासकामे | निधी |
|---|---|
| गणेश नगर अंतर्गत रस्ता करणे | 10,20,667/- |
| गणेश नगर (प्रभू श्रीराम उद्यान) जॉगिंग ट्रॅक तयार करणे | 16,28,913/- |
| गणेश नगर लेन नं.3 अंतर्गत रस्ता करणे | 16,10,097/- |
| गणेश नगर लेन नं.2 अंतर्गत रस्ता करणे | 23,95,901/- |
| गणेश नगर लेन नं.4 अंतर्गत रस्ता करणे | 27,48,829/- |
| पाण्याची टाकी ते पाचरणे दवाखाना अंतर्गत रस्ता तयार करणे | 26,83,899/- |
| पाण्याच्या टाकीमागील घर ते आव्हळवाडी रोड | 49,72,409/- |
| एकाई सोसायटी अंतर्गत रस्ता करणे | 10,00,000/- |
| साईराज पार्क ते आदर्श सोसायटी अंतर्गत रस्ता करणे | 18,53,243/- |



गणेश नगर लेन नं 4 येथे
अंतर्गत रस्त्याचे सिमेंट काँक्रिट काम.



**गणेश नगर येथील साईराज पार्क-२ ते एकाई सोसायटी रस्त्याचे काम सुरु**

संदीप सातव यांच्या पाठपुराव्याने मिळाला १० लाखांचा निधी

वाघोली : प्रतिनिधी

वाघोलीतील गणेश नगर येथील रस्त्याची दुरावस्था झाल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत होता. नागरिकांच्या रस्त्याची समस्या लक्षात घेता भाजप युवा मोर्चा पुणे जिल्हाध्यक्ष तथा पुणे महापालिका शासन नियुक्त समिती सदस्य संदीप सातव यांनी पुणे महापालिकेकडे रस्ता दुरुस्ती करणेबाबत सातत्याने पाठपुरावा केला. सातव यांच्या मागणीची दखल घेऊन गणेश नगर येथील साईराज पार्क-२ ते एकाई सोसायटी या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी १० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून रस्त्याच्या कामाला देखील सुरुवात झाली आहे. त्यामुळे रहिवाशांमधून समाधान व्यक्त होत आहे.




एंकाई सोसायटी व साईराज पार्क
येथे रस्ता डांबरीकराचे काम

# गणेश नगर परिसर

कार्य हाच परिचय,
विकास हेच उद्दिष्ट!
प्रभाग क्रमांक 4 | वाघोली-खराडी







# शिवतेज पार्क, रायसोनी कॉलेज परिसर




## निधी- 73.5 लाख

रायसोनी कॉलेज आणि शिवतेज पार्क हा परिसर प्रचंड वेगात वाढणारा... असंख्य गृहनिर्माण प्रकल्प, शिक्षणासाठी येणारे विद्यार्थी या भागात राहतात. गेली अनेक वर्ष या भागातील नागरी प्रश्न प्रलंबित होते. ग्रामपंचायतचा सदस्य/ उपसरपंच म्हणून काम करत असताना आणि नंतर पुणे मनपाच्या माध्यमातून या **भागातील ड्रेनेज आणि रस्त्याचे विषय कायमस्वरूपी मार्गी लावले.** पूर्वी इथे रस्त्यावर खड्डे, वाहणारे सांडपाणी याला सामोरे जावे लागत होते. परंतु आता त्यातून नागरिकांची सुटका झाली आहे.

| विकासकामे | निधी |
|---|---|
| जेल सोसायटी अंतर्गत रस्ता करणे | 14,20,935/- |
| जी. एच. रायसोनी ते ऑक्सी इवॉल्व सोसायटी रस्ता करणे | 30,00,000/- |
| शिवतेज पार्क अंतर्गत रस्ता करणे | 29,20,259/- |



जेल सोसायटी येथे रस्ता सिमेंट कॉंक्रीटीकरण



ऑक्सी इवॉल्व रोड



प्रभू श्रीराम उद्यान चौक



शिवतेज पार्क

# केसनंद रोड परिसर




## निधी- 1 कोटी 60 लाख

केसनंद रोडवर **काळे ओढा, शिवली वॉशिंग कंपनी, ऑक्सी अल्टीमा सोसायटी, श्रीराम सोसायटी, बालाजी विहार 1-2, दुबे नगर, बालाजी पार्क** हे भाग येतात, हजारो नागरिक या भागात राहण्यास आहे. येथील नागरिकांना अनेक काळापासून खराब रस्त्यांचा सामना करावा लागत होता. आज केसनंद रोड परिसरातील रस्ते काँक्रिटचे झाले आहेत याचा आनंद आहे.

| विकासकामे | निधी |
|---|---|
| श्रेयस मंगल कार्यालय ते केसनंद रोड अंतर्गत रस्ता करणे | 18,88,184/- |
| केसनंद रोड ते एकनाथ काळे यांचे घर ते श्रीराम सोसायटी रस्ता करणे | 32,15,161/- |
| शिवाली वॉशिंग कंपनी ते केसनंद रोड रस्ता करणे | 17,21,266/- |
| बालाजी पार्क लेन नं. 1,2, व 5 काँक्रिटी रस्ता करणे | 80,28,724/- |
| हिलशायर सोसायटी ते केसनंद रोड रस्ता करणे | 8,18,906/- |
| बालाजी विहार अंतर्गत रस्ता करणे | 2,99,830/- |



प्रभात पुणे, शुक्रवार, दि. २४ नोव्हेंबर २०१७ 07

# वाघोलीत लोकसहभागातून रखडलेले प्रश्न सुटले

## वार्ड क्रमांक ६ चा कायापालट : सामाजिक बांधीलकीच्या कामातून नवा आदर्श

वाघोली, दि. २३ (प्रतिनिधी) - वाघोली (ता. हवेली) येथील वार्ड क्र. ६ मध्ये संदीप सातव आणि इतरांनी विशेष पुढाकार घेऊन स्वखर्चाने, तसेच लोकसहभागातून रखडलेले प्रश्न सोडवून एक अनोखा आदर्श निर्माण केला आहे.

या कामात प्रामुख्याने रस्ता, वीज, पाणी आदी मूलभूत समस्यांचा समावेश आहे. वाघोलीच्या वार्ड क्र ६ मध्ये डोमखेल रोड स्ट्रीट लाईटचे काम, केसनंद रोडपासून दुबेनगर स्ट्रीट लाईट, शांती पार्क येथील रस्त्यावर मुरूम टाकणे, रायसोनी कॉलेजसमोरील शिवतेज पार्कमधील रस्त्यावर मुरूम टाकून दुरुस्ती करणे, ऑक्सी आल्टिमा रस्ता दुरुस्ती करणे, तसेच १५ वर्षे वादात असलेला काळुबाई नगर रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करण्यात आले आहे. बजरंग तरुण मंडळाच्या शेजारी बोअरवेल घेऊन, तसेच मोटर बसवून पाण्याची सोय करण्यात आली आहे.

### रस्ते, स्ट्रीट लाईट, बोअरवेल आदींचा समावेश

बजरंग तरुण मंडळासमोरील रस्ता दुरुस्ती करणे, प्रयागधाम सोसायटी, गायत्री सोसायटी रस्त्याची दुरुस्ती करणे, आव्हळवाडी रस्ता ते मेरी सोसायटी स्ट्रेट लाईट काम करणे, डोमखेल रोड आव्हळवाडी रोड स्ट्रीट लाईट, तसेच दुबेनगरमधील ट्रान्सफॉर्मरचे आणि अंतर्गत सर्व्हिस पोलचे काम आठ दिवसात मंजूर करून चालू करावे, यासाठी महावितरणकडे पाठपुरावा करण्यात आला आहे.


### कॉंक्रिटीकरण, हॅलोजनचे दिवे, पाण्याच्या मोटारची सोय

याबरोबरच अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या शांती पार्क, प्रयागधाम सोसायटी, गायत्री पार्क स्ट्रीट लाईटचे काम, केसनंद रोड पासून दुबेनगर, डोमखेल रोड, आव्हळवाडी रोड, आव्हळवाडी रोड ते मेरी सोसायटी, शांती पार्क, प्रयागधाम सोसायटी, गायत्री सोसायटी, बजरंग तरुण मंडळ या ठिकाणी सात मोठे हॅलोजन बसवण्यात आले आले आहेत. याखेरीज गणेशनगर, सिद्धी पार्क सोसायटी, बजरंग तरुण मंडळ, काळूबाई नगर या ठिकाणी स्ट्रीट लाईटचे काम करण्यात आले आहे.

ही कामे पूर्ण करून नागरिकांच्या समस्या सोडवण्यात संदीप सातव, जयश्री काळे, मालती गोगावले आदींनी पुढाकार घेतल्याने सामाजिक बांधीलकीचा नवा आदर्श वाघोलीत उभा राहिला आहे.

वाघोली (ता. हवेली) : रस्ते, वीज आणि पाणी या मूलभूत समस्या सोडवण्याचे काम लोकसहभागातून झाले आहे.







# काळूबाई नगर




**गेल्या 20 वर्षांपासून विकासापासून वंचित असलेला भाग** म्हणजे काळूबाई नगर... प्रचंड झपाट्याने वाढणारे गृहनिर्माण प्रकल्प, वाढणारे रहिवासी लक्षात घेता चांगले रस्ते, ड्रेनेज याचा समस्या मोठ्या प्रमाणात होत्या. **सांडपाणी रस्त्यावरुन वाहत होते,** खराब रस्त्यांमुळे नागरिकांचे अपघात होत होते. ग्रामपंचायच सदस्य झाल्यानंतर मी व माझ्या सहकाऱ्यांनी ठरवले होती की या भागाचा कायापालट करायचाच. या दृष्टीने पहिले म्हणजे या भागात अतंर्गत ड्रेनेज लाईन सर्व भाग ड्रेनेज मुक्त केला व नंतर काँक्रिटचे चांगले रस्ते करुन या भागातील रस्त्यांचा देखील विषय मार्गी लावण्यात आला.

| विकासकामे | निधी |
|---|---|
| काळुबाईनगर लेन नं.1, 2 व 3 अंतर्गत रस्ता करणे | 29,97,596/- |
| काळुबाई लेन नं.4 अंतर्गत रस्ता | 29,97,596/- |





काळूबाई नगर येथील 20 वर्षे रखडलेल्या रस्त्याचे काम स्वखर्चातून चालू केले.





वाघोली : रस्त्याचे कॉंक्रिटीकरण झाल्यानंतर गुलाल उधळून आनंद व्यक्त करताना महिला.

## वीस वर्षांनंतर सुटला रस्त्याचा प्रश्न

वाघोली, ता. २६ : वीस वर्षांपासून प्रलंबित असलेला वाघोलीतील काळूबाईनगर येथील रस्त्याचा प्रश्न सुटला आहे. रस्त्याचे नुकतेच स्वखर्चातून कॉंक्रिटीकरण करण्यात आले. मनसेचे संदीप सातव, जयश्री काळे व मालती गोगावले यांनी यासाठी निधी दिला. रस्त्याचे काम झाल्यानंतर परिसरातील महिलांनी गुलाल उधळून आनंद व्यक्त केला.

"सुमारे २० वर्षांपासून रस्त्याचा प्रश्न रखडला होता. नागरिकांचे हाल होत होते. तेथील काही जागामालकांचाही जागेबाबत वाद होता. जागामालकांशी चर्चा केली. त्यांनी परवानगी दिल्यानंतर ग्रामपंचायत निधीची वाट न पाहता नागरिकांच्या सोयीसाठी स्वखर्चाने रस्त्याचे कॉंक्रिटीकरण केले.

- संदीप सातव, जयश्री काळे, मालती गोगावले

सुमारे २५० फूट लांब, १६ ते १८ फूट रुंदीचा कॉंक्रिट रस्ता करण्यात आला आहे. यासाठी सुमारे १२ लाख रुपयांचा खर्च आला. केसनंद फाट्यावरून काळूबाईनगरकडे जाणारा रस्ता अरुंद आहे. तेथील काही जागामालक रस्त्याचे काम करण्यास विरोध करत होते. यामुळे फुटभर रस्त्यावरूनच नागरिकांना जावे लागत होते. पावसाळ्यात या खड्ड्यांत पाणी साचत असल्यामुळे त्यातूनच मार्ग काढावा लागत होता. अनेकांनी हा रस्ता करण्याबाबत प्रयत्न केले; मात्र जागेच्या वादामुळे २० वर्षांपासून रस्त्याचा प्रश्न रखडला होता. रस्त्याचे काम हाती घेतल्यानंतर काही जागामालक तो अडवत होते. मागील वर्षी पावसाळ्यात खूप हाल होऊ लागल्याने परिसरातील रणरागिणी एकत्र आल्या. त्यांनीही दंड थोपटत कोण आडवे येते, असे आवाहन दिले. त्यानंतर खड्ड्यांत मुरूम टाकून तात्पुरता रस्ता करण्यात आला होता; मात्र केवळ तात्पुरती सोय झाली होती. तेथे पुन्हा खड्डे पडले होते. आता कॉंक्रिट रस्ता झाल्याने रहिवाशांची सोय झाली आहे.

# दुबे नगर




## एकूण निधी - 1.25 कोटी

गेले अनेक वर्षे दुबे नगरचा विकास रखडला होता. खराब रस्त्यांनी होणार रोजचा प्रवास, होणारे अपघात यामुळे नागरिक त्रासले होते. दुबे नगर मधील **साई मंदिर ते गुरुकृपा आश्रम** सिमेंट काँक्रिट रस्ता, तब्बल **50 लाख रुपये** इतका निधी खर्च करून पूर्ण केला. जिल्हा परिषदेकडे पाठपुरावा करून, **दुबे नगर- केसनंद रोड** या रस्त्यासाठी **24 लाख रुपये** निधी मंजूर करून घेतला. त्याबरोबर PMRDA कडे पाठपुरावा करून **पाण्याची लाईन** टाकून पाण्याचा देखील प्रश्न कायमस्वरुपी सोडवण्यात येणार आहे.

दुबेनगर येथील **लेन नंबर 13 गुरुकृपा आश्रम ते गुरुदत्त सोसायटी** रस्त्याचे काम देखील करण्यात आले. या रस्त्यासाठी **50 लाख रुपये** निधी मंजूर करण्यात आला होता. हा रस्ता करण्यासाठी पुणे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी मदत केली. आम्ही फक्त रस्ते करुन थांबलो नाही तर रस्त्यावर पडणारे खड्डे वेळोवेळी बुजवण्याचे काम देखील करण्यात आले आहे.





गुरुकृपा आश्रम ते गुरुदत्त सोसायटी रस्त्याचे काम चालू झाले



केसनंद रोड ते दुबेनगर रस्ता डांबरीकरण



साई मंदिर ते गुरुकृपा आश्रम रस्ता
सिमेंट काँक्रिट केला

“सशक्त शहर म्हणजे केवळ इमारतींचा समूह नव्हे,
तर एकत्र राहणाऱ्या, स्वप्ने पाहणाऱ्या आणि
भविष्य घडवणाऱ्या नागरिकांची उर्जा असते.”

# रस्ते दुरुस्ती



# रस्ते दुरुस्ती




वाघोलीतील रस्ते विकासासाठी मी ग्रामपंचायत सदस्य, उपसरपंच आणि शासन नियुक्त समिती सदस्य या भूमिकांमधून काम करत असताना अनेक महत्त्वाची रस्त्यांची कामे पूर्ण केली. केवळ काम सुरु करून थांबलो नाही, तर **स्वतः प्रत्यक्ष उपस्थित राहून** कामाची गुणवत्ता टिकवण्यासाठी सातत्याने लक्ष ठेवले. प्रत्येक रस्त्याच्या कामाची सुरुवात झाल्यावर, त्याचे साहित्य, कामाचा दर्जा, वेळेत पूर्णता आणि नागरिकांची सोय यांची स्वतः खात्री केली.

वाघोली हे झपाट्यानं वाढणारं शहर आहे, येथे अनेक गृहनिर्माण प्रकल्प उभे राहत असून रोजची रहदारी मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. यामुळे रस्त्यांवर खड्डे निर्माण होणे, काही ठिकाणी रस्ते उखडणे असे प्रकार वेळोवेळी घडतात. नागरिकांकडून तक्रारी येतात किंवा मी स्वतः गावात फिरताना अशी अडचण दिसली, तर मी **वेळ न घालवता प्रशासकीय अधिकाऱ्यांशी संपर्क करून त्वरित खड्डे बुजवण्याची व्यवस्था केली** आहे.प्रत्येक वेळी **तातडीने प्रतिसाद देणं, प्रश्नांची दखल घेणं आणि त्यावर कायमस्वरूपी तोडगा काढणं हेच माझं काम करण्याचं ब्रीद राहिलं आहे.** त्यामुळेच वाघोलीतील रस्ते हे फक्त विकासाचं प्रतीक नाहीत, तर त्या मागचं नियोजन, तत्परता आणि जबाबदारी यांचंही प्रतिबिंब आहेत.



रोहन अभिलाषा कॉर्नर ते सातव वस्तीकडे जाणाऱ्या रस्त्याचे डांबरीकरण



वाघोली केसनंद रस्त्याची दुरुस्ती



गोल्डन सोसायटी मधील अंतर्गत रस्त्याची डांबर टाकून दुरुस्ती



वाघोली येथील अनुसया पार्ककडे जाणारा रस्ता

वाघोली येथील अनुसया पार्ककडे जाणाऱ्या रस्त्याची दुरवस्था होऊन येथे दुर्गंधीयुक्त मैलापाणी साचत आहे. या रस्त्याची पाहणी करताना संदीप सातव आणि



अनुसया पार्क येथील रस्त्याची डागडुजी



केसनंद रोड येथे खडी टाकून रस्त्याची डागडुजी

# रस्ते दुरुस्ती






केसनंद रोडवरील ईपिक सोसायटी व पेट्रोल पंप समोरील रस्त्यावरचे सगळे खड्डे बुजवण्यात आले.



केसनांद रोडवर खडी टाकून दुरुस्ती







गणेश नगर भागातील मदरमेरी सोसायटी ते आदर्श पार्क सोसायटी मध्ये जाणाऱ्या रस्त्यावर डांबर टाकून खड्डे बुजविण्यात आले.







# रस्ते दुरुस्ती








प्रभात

Gramin_30 July 2024_015
30 Jul 2024
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे

## निषेध नोंदवत ग्रामस्थांनी खड्डे बुजवले

**वाघोली, दि. २९ (प्रतिनिधी)** - वाघोली-केसनंद रस्त्यांची मोठ्या प्रमाणावर चाळण झाली असून मोठ मोठे खड्डे पडले आहेत, अनेक अपघात झाले परंतु अधिकारी यांचे जाणीपूर्वक दुर्लक्ष करत होते. नागरीकांना नाहक त्रास सहन करावा लागत होता. याचा निषेध नोंदविण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकार्यांची गाडी अडवत गांधीगिरी करत निषेध करून केसनंद रस्त्यावरील खड्डे बुजविण्यात आले. यावेळी पुणे महानगरपालिका शासन नियुक्त सदस्य संदीप सातव व शांताराम बापू कटके यांच्यासह स्थानिक नागरिक उपस्थित बहुसंख्येने उपस्थित होते.

सार्वजानिक बांधकाम विभाग अधिकाऱ्यांची गाडी अडवून
त्यांच्यासमोर केसनंद रस्त्यावरील खड्डे बुजवत प्रशासनाचा निषेध नोंदवला





केसनंद रोड - कोणार्क सोसायटी गेट समोरील रस्ता दुरुस्ती





सार्वजानिक बांधकाम विभागाच्या (pwd) च्या माध्यमातून केसनंद रोडवरील खड्डे बुजवण्यात आले

# वाघोली बाह्यवळण रस्ता




वाघोलीमधील पुणे–अहिल्यानगर महामार्गावर गेल्या अनेक वर्षांपासून वाहतूक कोंडीची गंभीर समस्या निर्माण झाली होती. हा प्रश्न दिवसेंदिवस अधिक तीव्र होत चालला होता. या पार्श्वभूमीवर **पुणे–अहिल्यानगर मार्गाला पर्यायी मार्ग म्हणून वाघोलीसाठी बाह्यवळण (Bypass)** रस्त्याची मागणी सातत्याने होत होती. वाघोली ग्रामपंचायत तसेच स्थानिक नागरिक, सामाजिक संस्था आणि सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या वतीने तत्कालीन पालकमंत्री मा. चंद्रकांतदादा पाटील यांच्याकडे यासाठी निधीची मागणी करण्यात आली होती. दादांनीही याची गांभीर्याने दखल घेत **पुणे महानगरपालिकेला या रस्त्यासाठी आवश्यक निधीची तरतूद करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले.**

या मागणीनंतर आमदार राहुलदादा कुल आणि भाजप पुणे जिल्हाध्यक्ष मा. प्रदीपदादा कंद यांनी वेळोवेळी पुणे महानगरपालिकेचे आयुक्त आणि संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठका घेतल्या. या बैठकींमध्ये वाघोली वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी बाह्यवळण रस्त्याचा तत्काळ **डीपीआर (Detailed Project Report) तयार करून टेंडर प्रक्रिया लवकरात लवकर सुरू करण्याची विनंती करण्यात आली.** या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी केंद्रीय मंत्री व तत्कालीन महापौर मा. मुरलीधर अण्णा मोहोळ यांचीही भेट घेण्यात आली. त्यांनीही या कामासाठी आवश्यक पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. आजही वाघोलीतील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी हा रस्ता अत्यंत आवश्यक आहे, आणि संबंधित यंत्रणांनी तातडीने पुढील पावले उचलावीत, हीच जनतेची अपेक्षा आहे.



मा. मुरलीधर आण्णा मोहोळ (केंद्रीय राज्यमंत्री),
मा. धिरजजी घाटे (शहराध्यक्ष, पुणे भाजपा)
व मा. श्रीनाथ भीमाले (पुणे लोकसभा समन्वयक (प्रभारी)




मा. राहुल दादा कुल (आमदार दौंड विधानसभा)
व मा. हेमंतजी रासने (आमदार कसाब विधानसभा)



मा. चंद्रकांत दादा पाटील
(उच्च व तंत्रशिक्षण तथा संसदीय कार्य मंत्री)

# बाजारतळ भाजी मंडई शेड




## एकूण निधी- 1 कोटी 80 लक्ष रूपये

बाजारातळामध्ये आपल्या सर्वांना माहितच असेल की एकेकाळी चिखलाचे साम्राज्य होते. महिला भगिनींना या चिखलाचा सामाना करत आपला बाजार रहाट करावा लागत असे. ग्रामपंचायत मध्ये काम करत असताना सुसज्ज अशी भाजी मंडई करण्यासाचा निश्चय केला आणि आज आपण पाहताच की भाजी विक्रेते, व्यापारी, शेतकरी बांधव यांना बसण्यासाठी ओटे, भाजी खरेदी करणाऱ्या नागरिकांसाठी डोक्यावर शेड झाले आणि त्यांचा चिखलातील प्रवास थांबला.

| विकासकामे | निधी |
|---|---|
| वाघोली येथे दैनंदिन बाजार शेड मधील आरसीसी ओटे बांधकाम व अंतर्गत रस्ता करणे | 84,93,637/- |
| वाघोली येथील भाजी मंडई शेड बांधणे | 71,26,427/- |
| बाजारतळ ओटे उर्वरीत काम करणे | 2,65,784/- |



पुढारी

बाजारासाठीच्या अत्याधुनिक शेडचे काम वेगात

नागरिकांमध्ये समाधान; पाणी, शौचालयाची मागणी

लोणीकंद : वार्ताहर

वाघोली (ता. हवेली) येथील रोजच्या बाजारासाठी व्यापारी, शेतकरी व ग्राहकांना ऊन, पाऊस यांपासून संरक्षण मिळावे आणि शेतीचा माल खराब होऊ नये यासाठी वाघोली ग्रामपंचायत निधीमधून आधुनिक शेड बांधण्यात येत असलेल्या कामाला गती आली आहे. त्यामुळे शेतकरी, व्यापारी व ग्राहक समाधान व्यक्त करत आहेत.

वाघोली येथे परिसरातील सर्वात मोठा आठवडे बाजार भरतो. या बाजारामध्ये सकाळी व सायंकाळी शेतकरी माल विक्रीसाठी आणतात. दिवसेंदिवस वाढत्या नागरीकरणामुळे ग्राहकांच्या संख्येतही वाढ झाली आहे. त्यामुळे रोजचा भाजीपाला व इतर वस्तू खरेदी करण्यासाठी ग्राहकांची गर्दी असते. सद्यःस्थितीत तात्पुरते शेड उभारून देण्यात आले आहे; मात्र पावसाळ्याच्या दिवसात या शेडचा फारसा उपयोग होत नसल्यामुळे बऱ्याच वेळा व्यापारी व शेतकऱ्यांच्या मालाचे नुकसान होते. व्यापारी, शेतकरी यांचा माल खराब होऊ नये आणि ग्राहकांना पावसाळ्यात व उन्हाळ्यात गैरसोय होऊ नये यासाठी ग्रामपंचायतीकडून अत्याधुनिक शेडसाठी ७२ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत गेल्या पाच महिन्यांपूर्वीच दोन कामांचे भूमिपूजनही झाले असून, या कामाला गती आली आहे. रात्री दहापर्यंत ग्राहकांची वर्दळ चालूच असते, त्यामुळे बाजारतळामध्ये लाइट, पाणी व शौचालयाची व्यवस्था करावी, अशी मागणी होत आहे.

ग्रामपंचायतीच्या वतीने अत्याधुनिक शेडची उभारणी होत आहे. याचा ग्राहकांना, शेतकऱ्यांना व विक्रेत्यांना मोठा फायदा होणार आहे; परंतु ग्राहक, व्यापारी, शेतकरी यांच्यासाठी पाणी, शौचालय, वीज आदी मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्यास अधिक चांगले होईल. असे राष्ट्रवादीचे संदीप थोरात म्हणाले.

वाघोली ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात येणाऱ्या आधुनिक शेडच्या कामाला वेग आला आहे.

Pune Gramin Edition
4 Mar, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com



प्रभात पुणे, मंगळवार, दि. ५ मार्च २०१९ ४

बाजार तळावर अत्याधुनिक शेडच्या कामाला गती

ग्रामपंचायत निधीतून काम मार्गी : व्यापारी, शेतकरी व ग्राहक सुखावला

वाघोली, दि. ४ (प्रतिनिधी) - वाघोली (ता. हवेली) येथील रोजच्या भरणाऱ्या बाजासाठी व्यापारी, शेतकरी व ग्राहकांना ऊन, पाऊस यापासून संरक्षण मिळावे आणि शेतीचा माल खराब होऊ, यासाठी वाघोली ग्रामपंचायत निधीमधून आधुनिक शेड बांधण्यात येत असलेल्या कामाला गती आली आहे. त्यामुळे शेतकरी, व्यापारी व ग्राहकवर्गातून समाधान व्यक्त होत आहे.

वाघोली येथे परिसरातील सर्वात मोठा आठवडी बाजार भरतो. या बाजारामध्ये सकाळी व सायंकाळी शेतकरी शेतातील भाजीपाला व अन्य माल विक्रीसाठी आणतात. दिवसेंदिवस वाढत्या नागरिकीरणामुळे ग्राहकांच्या संख्येतही वाढ झाली आहे. त्यामुळे रोजचा भाजीपाला व इतर वस्तू खरेदी करण्यासाठी ग्राहकांची गर्दी असते.

दररोजचा भाजीपाला व माल विक्रेत्यांना सध्यस्थितीत तात्पुरते शेड उभारून देण्यात आले आहे. मात्र, पावसाळ्याच्या दिवसात या शेडचा फारसा उपयोग होत नसल्यामुळे बऱ्याचवेळा व्यापारी व शेतकऱ्यांच्या मालाचे नुकसान होते.

व्यापारी, शेतकरी यांचा माल खराब होऊ नये आणि ग्राहकांना पावसाळ्यात व उन्हाळ्यात गैरसोय होऊ नये, यासाठी ग्रामपंचायतीकडून अत्याधुनिक शेडसाठी ७२ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत गेली पाच महिन्यांपूर्वीच दोन कामांचे भूमिपूजनही झाले आहे. त्यामुळे या कामाला गती आली आहे. शेतकऱ्यांसह व्यापारीवर्गामधून समाधान व्यक्त केले जात आहे. मात्र, रात्री दहा वाजेपर्यंत ग्राहकांची वर्दळ चालूच असते. त्यामुळे बाजारतळमध्ये लाईट, पाणी व शौचालयाची व्यवस्था करावी, अशी मागणी होत आहे.

वाघोली (ता. हवेली) : येथील ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात येणाऱ्या अत्याधुनिक शेडच्या कामाला वेग आला आहे.

मूलभूत सुविधा द्या

राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी सेलचे प्रदेश सचिव संदीप थोरात म्हणाले की, ग्रामपंचायतीच्या वतीने अत्याधुनिक शेडची उभारणी होत आहे. याचा ग्राहकांना, शेतकऱ्यांना व विक्रेत्यांना मोठा फायदा होणार आहे. परंतु ग्राहक, व्यापारी, शेतकरी यांच्यासाठी पाणी, शौचालय, लाईट आदी मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्यास अधिक चांगले होईल.



# बाजारतळ भाजी मंडई शेड










बाजारतळ भूमिपूजन करते वेळेस.





बाजारतळ काम प्रगतिपथावर असताना पाहणी.


आपण स्वतः प्रकाश झालो तर,
अनेकांचा अंधार आपोआप दूर होईल.
वीजपुरवठा

# वीजपुरवठा




वाघोली परिसरातील नागरिकांना वेळोवेळी होणाऱ्या वीजपुरवठा अडचणींमुळे अनेक समस्यांचा सामना करावा लागत होता. लाईट वारंवार जाणे, व्होल्टेज कमी-जास्त होणे, खराब झालेले ट्रान्सफॉर्मर, डी.पी. व स्ट्रीट लाईटचे रखडलेले कामे यामुळे नागरिक त्रस्त होते. विशेष करून मदरमेरी सोसायटीतील ट्रान्सफॉर्मर अचानक बंद पडल्यामुळे परिसरातील वीजपुरवठा खंडित झाला होता. नागरिकांनी संपर्क साधताच मी तात्काळ महावितरणचे अधिकारी यांच्याशी पाठपुरावा सुरू केला आणि महावितरणच्या सहकार्याने नवीन **315 केव्ही** क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर बसवण्यात आला आणि वीजपुरवठा पुन्हा पूर्ववत करण्यात आला. या कामासाठी जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल श्री. मारुती विठोबा सातव यांनी जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल विशेष आभार.

यासोबतच **गणेश नगर भागातील साईराज पार्क (1, 2, 3), समर्थ पार्क, आदर्श पार्क, इंकाई सोसायटी, गणराज पार्क** या परिसरात वारंवार वीजपुरवठा खंडित होणे व व्होल्टेजच्या अडचणी होत्या. यासाठी महावितरणकडे अनेक वेळा पाठपुरावा करून नवीन ट्रान्सफॉर्मर बसवण्यात यश आले. तसेच गुलमोहर पार्क सोसायटीमध्ये डी.पी. आणि स्ट्रीट लाईटच्या समस्यांमुळे नागरिक त्रस्त होते. महावितरण अधिकाऱ्यांशी सातत्याने चर्चा करून आणि पाठपुरावा करून **नवीन डी.पी** बसवण्यात आली. यानंतर गुलमोहर पार्क सोसायटीतील नागरिकांनी समाधान व्यक्त करत मला सत्काराच्या माध्यमातून सन्मानित केले.

बुधवार, दि. २५ नोव्हेंबर २०२०



## वाघोली : महावितरण कार्यालय समोर वीज बिलांची होळी

हवेली
जनप्रवास प्रतिनिधी

सरकारविरोधी घोषणा देत निषेध व्यक्त

वाघोली ता हवेली येथे वीज ग्राहकांना आलेल्या वाढीव वीज बिलाच्या व महाविकास आघाडी सरकारकडून बिलात सवलत दिली जात नसल्याच्या निषेधार्थ महावितरण कार्यालयासमोर हवेली तालुक्यातील भाजप पदाधिकाऱ्यांनी वीज बिलांची होळी करत सरकारविरोधी घोषणा देत निषेध व्यक्त करत आंदोलन करण्यात आले. यावेळी महावितरणला लेखी निवेदन देण्यात आले.

यावेळी भाजपा युवा मोर्चा पुणे जिल्हा संघटन सरचिटणीस संदिप सातव, गणेश कुटे, अनिल सातव, नितीन गावडे सह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## भाजपकडून वीजबिलांची होळी

### मांजरी, वाघोलीमधील महावितरणच्या कार्यालयांसमोर आंदोलन




## महावितरणचे उपविभागीय कार्यालय वाघोलीत होणार कार्यान्वित

### अधिकाऱ्यांशी सलगी, एजंट वाढले; ग्राहकांची प्रचंड लूट

**विभाजनाचे काम लवकरच मार्गी**

वाढत्या ग्राहक संख्येमुळे उपविभागीय कार्यालय होणे गरजेचे आहे. त्यानुसार प्रशासकीय मान्यतेसाठी मुख्य कार्यालयाकडे प्रस्ताव पाठवण्यात आला असून, लवकरात लवकर विभाजनाचे काम मार्गी लागणार आहे.

- राजेंद्र पवार, अधीक्षक अभियंता, ग्रामीण, पुणे



महावितरणची वाघोली येथील धूळ खात पडलेली नवीन प्रशस्त इमारत.

**अन्यथा कार्यालयाला टाळे ठोकणार**

नवीन मीटर जोडणी व इतर कामासाठी महावितरण विलंब करत असल्यामुळे एजंटचे प्रमाण वाढले असून, ग्राहकांची मोठ्या प्रमाणावर आर्थिक लूट केली जात आहे. केलीच एजंटगिरी थांबवा अन्यथा कार्यालयाला टाळे ठोकले जाईल.

- संदीप सातव, ग्रा.पं. सदस्य


My Gramin
Page No. 03 Feb 02, 2018
Powered by: erelego.com

# स्ट्रीट लाईट




ग्रामपंचायतच्या माध्यमातून वॉर्ड क्र. 6 मध्ये ज्या पद्धतीने ड्रेनेज, रस्त्यांचे विषय मार्गी लावले त्याच पद्धतीने स्ट्रीट लाईटचे काम होणं गरजेचं होतं. वॉर्ड क्रमांक 6 मध्ये जवळपास **सर्वच मुख्य ठिकाणी** स्ट्रीट लाईटचे काम करण्यात आले. याचबरोबर उपसरपंच असताना वाघोलीतील प्रत्येक भागात स्ट्रीट लाईट लावण्याचे काम केले.

यामध्ये सर्वात लाक्षणिक काम राहिले ते वाघोली-केसनंद रोडवरील स्ट्रीट लाईट... महानगरपालिकेच्या 2024-25 च्या अर्थसंकल्पात **60 लक्ष रूपये निधी** मंजूर करून घेतला आणि काम पूर्ण करून घेतले. त्याचबरोबर **वाघोली लोहगाव रोड** देखील अंधार मुक्त करण्याचे काम करण्यात आले.



नगररोड वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र. 2823
दिनांक 19/7/24

मा.महापालिका आयुक्त,
तथा अध्यक्ष वित्तीय प्रशासकीय समिती,
पुणे महानगरपालिका

उप-आयुक्त
परिमंडळ विभाग क्र.-१
जावक क्र. उपआ/2740
दिनांक- 19/07/24

यांजकडेस सविनय सादर

विषय :- नगररोड वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालय सन 2024 – 25 च्याअंतर्गत नव्याने समाविष्ट गावां मधील वाघोली मधील विविध ठिकाणी विद्युत विषयक कामे करणे करिता र.रु.६० लक्ष तरतूद उपलब्ध होणेस व निविदा प्रक्रिया करणेच्या कार्यवाहीस मा.महापालिका आयुक्त तथा अध्यक्ष वित्तीय प्रशासकीय समिती, पुणे महानगरपालिका यांची मान्यता मिळणेबाबत.

**संदर्भ** - श्री. श्री.संदीप सोमनाथ सातव यांचे दि.१८/०६/२४ चे पत्र

वाघोली मध्ये विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था नसल्याने नागरिकांना रात्रीच्या वेळी विविध अडचणींना सामोरे जावे लागत आहे. तसेच वाघोली शहरातील बऱ्याच परिसरात अजून पर्यंत पथदिवे लावलेले नाही पथदिवे नसल्यामुळे तसेच या बंद असलेल्या पथदिव्यांमुळे नागरिकांना रस्त्यावर फिरणे अतिशय धोकादायक झाले असले बाबतचे संदर्भ क्र१) चे पत्रान्वये श्री.संदीप सोमनाथ सातव यांनी कळविले आहे.

उपरोक्त बाबींचे अनुषंगाने उपरोक्त ठिकाणांच्या प्रकाश व्यवस्था विषयक तक्रारींचे निरसन करणेसाठी श्री संदीप सोमनाथ सातव यांचे पुणे मनपाच्या सन २०२४-२५ करीता र.रु.६० लक्ष तरतूद उपलब्ध होणे कामी पत्र प्राप्त झाले आहे.

तरी नगररोडवडगावशेरीक्षेत्रीय कार्यालया अंतर्गत सन २०२४-२०२५ च्या मधील सोबतच्या परिशिष्ट- अ नुसार र.रु.६० लक्ष तरतूद उपलब्ध होणेस व सदर नमूद कामांच्या निविदा प्रक्रिया करणेस मा.महापालिका आयुक्त तथा अध्यक्ष वित्तीय प्रशासकीय समिती,पुणे महानगरपालिका यांची प्रशासकीय मान्यता मिळणेस विनंती आहे.

मा.स.कळावे.

| | | |
|---|---|---|
| (मंगेश सिसाळ) | (महेश सातपुते) | (सोमनाथ बनकर) |
| कनिष्ठ अभियंता | उप अभियंता | महापालिका सहाय्यक आयुक्त |
| नगररोड वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालय | नगररोड वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालय | नगररोड वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालय |
| पुणे महानगरपालिका | पुणे महानगरपालिका | पुणे महानगरपालिका |

**सोबत** - १) श्री संदीप सोमनाथ सातव यांचे पत्र
२) परिशिष्ट- अ

मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका यांचे मार्फत.......

18/07/24.
(किशोरी शिंदे-तोडमल)
उपआयुक्त
परिमंडळ कार्यालय क्र.१
पुणे महानगरपालिका

अति. महा. आयुक्त (जनरल)
पुणे महानगरपालिका

मा. आयुक्त

अतिरिक्त महा. आयुक्त (ज) कार्यालय
आवक क्र. 3८५४ दि.१९०७१२४
जावक क्र. 3८५४ दि.२२।०७।२४

महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका





# स्ट्रीट लाईट

कार्य हाच परिचय,
विकास हेच उद्दिष्ट!
प्रभाग क्रमांक. 4 | वाघोली-खराडी





विनायक पार्क परिसरात मधील स्ट्रीट लाईट चालू करण्यात आली






सातव वस्ती वॉटर पार्क रोड येथील स्ट्रीट लाईट दुरुस्ती





कारिया सोसायटी ते हिलशायर सोसायटी पर्यंत स्वखर्चाने स्ट्रीट लाईट लावल्या.



आव्हळवाडी रोडवरील कोझी होम्स पर्यंत स्वखर्चाने स्ट्रीट लाईट बसविल्या

# स्ट्रीट लाईट










अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला डोमखेल फाटा ते गणेशनगर स्ट्रीट लाईट प्रश्न मार्गी लावला





केसनंद रोडवरील कारिया सोसायटी, सुखवानी सोसायटी, मिकासा सोसायटी, बालाजी विहार स्वखर्चाने स्ट्रीट लाईट बसविण्यात आली







# भामा आसखेड पाणीपुरवठा योजना




## निधी - 230 कोटी

वाघोलीच्या पाणी प्रश्न कायमचा मिटवण्यासाठी अजून एक महत्त्वाची योजना ठरणार आहे ती म्हणजे भामा आसखेड पाणी पुरवठा योजना...पुणे महानगर पालिकेने लोहगाव-वाघोलीसाठी ही योजना मंजूर केली होती. ही योजना लवकरात लवकर पूर्ण व्हावी यासाठी वेळोवेळी पुणे महानगरपालिकेकडे बैठका घेतल्या, शासन दरबारी पाठपुरावा केला. तत्कालीन पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी भामा-आसखेड पाणी पुरवठा योजना मंजूर केली.



पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी वाघोली साठी
भामा आसखेड पाणी पुरवठा योजना मंजूर केली

### वाघोलीला भामाआसखेडचे पाणी मिळण्यासाठी आंदोलनात सहभागी होणार : विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर

**वाघोलीतील प्रभू श्रीराम उद्यानाचे दरेकर यांच्या हस्ते उद्घाटन ; महाविकास आघाडीवर केली टीका**



वाघोली टाईम्स : प्रतिनिधी

वाघोलीचा महापालिकेत समावेश केला असल्याने भामा आसखेडचे पाणी वाघोलीला मिळाले पाहिजे, पाण्यासाठी आंदोलन उभे केले तर स्वतः आंदोलनात सहभागी होऊन पाणी मिळवून देऊ अशी घोषणा विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांनी वाघोली येथे केली. यावेळी त्यांनी महाविकास आघाडीवर कडाडून टीका केली.

वाघोली गणेशनगर येथील प्रभू श्रीराम उद्यानाचे उद्घाटन तसेच संदीप सातव यांच्या क्विक रिस्पॉन्स टीम या मोफत सुविधेचे व वाहनाचे उद्घाटन प्रवीण दरेकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी राहुल कुल, बापू पठारे, प्रदीप कंद, गणेश भेगडे, बाबाराजे जाधवराव, किरण दगडे, रोहिदास उंद्रे, वाघोली व हवेली परिसरातील भाजपचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते. नवनियुक्त भाजप पदाधिकाऱ्यांना निवडीचे पत्र देखील उपस्थितांच्या हस्ते देण्यात आले.

दरेकर बोलताना म्हणाले कि, २३ गावे महापालिकेत घेत असताना येथे नागरिकांना मुलभूत सोयी मिळाव्यात यासाठी स्वतंत्र निधी द्यावा असा आग्रह केला होता. आता भामाआसखेडचे पाणी देण्यावरून दोन स्थानिक आमदारांची विसंगत मते आहेत. वाघोलीला भामाआसखेडचे पाणी, सुविधा मिळाल्याच पाहिजे. त्याचबरोबर महाविकास आघाडीमध्ये विकास कामांबाबत चाललेला श्रेयवाद, वाढती गुन्हेगारी व इतर राजकीय मुद्दयांवर दरेकर यांनी सडकून टीका केली.

www.wagholitimes.in

Digital Exclusive

# वाघोली ग्रामस्थांचा पाण्याचा प्रश्न सोडवा

## सर्वपक्षीय नेत्यांची अपेक्षा ; भामा आसखेड योजनेचे पाणी देण्याची मागणी




समावेश गावांचा

**वाघोली, ता. ११ :** पुणे महापालिकेत वाघोलीचा समावेश झाला आहे. परिसरात पाणी, कचरा व ड्रेनेजच्या समस्या आहेत. यापैकी पाणी प्रश्न सर्व प्रथम सोडवावा, अशी अपेक्षा सर्व राजकीय पक्षांच्या नेत्यांकडून व्यक्त करण्यात आली आहे. भामा आसखेड योजनेचे पाणी वाघोलीला देण्याची मागणीही या वेळी त्यांनी केली.

वाघोलीत मुख्यतः रस्त्यांची कामे झाली आहेत. पथदिवे, गार्डन अन्य सुविधा ही आहेत. मात्र, पाणी, कचरा, ड्रेनेज या तीन गंभीर समस्या आहेत. कचरा प्रक्रिया प्रकल्प व ड्रेनेज वाहिन्यांची येथे गरज आहे. मात्र परिसरात पाण्याची सर्वात मोठी समस्या आहे. पूर्वीच्या लोकसंख्येला पुरेल, अशी पाणी योजना सध्या कार्यान्वित आहे. पीएमआरडीए देखील नवीन योजना राबवीत आहे. मात्र, ती ही पुरेशी ठरणार नाही. या योजना उन्हाळ्यात पाण्याअभावी कुचकामी ठरतात आहे. यामुळे सर्वात प्रथम पाणी प्रश्न सोडविण्याची मागणी या नेत्यांकडून करण्यात आली आहे.

- **संदीप सातव (भाजप) :** परिसरात कचरा, ड्रेनेजपेक्षा पाणी समस्या प्राधान्याने सोडवण्यात यावी. भामा आसखेड योजनेचे पाणी नागरिकांना उपलब्ध करून द्यावे.
- **गणेश म्हस्के (मनसे) :** ज्या योजनेद्वारे शक्य होईल त्या योजनेद्वारे महापालिकेने वाघोलीचा पाणीप्रश्न सर्वप्रथम सोडवावा.
- **राजेंद्र सातव (माजी उपसरपंच) :** कचऱ्याची व ड्रेनेजची मुख्य समस्या आहे. पाण्यालाही प्राधान्य दिलेच पाहिजे. भामा आसखेडचे पाणी दिल्यास समस्या सुटेल.

**"ग्रामपंचायतीने शक्य तेवढी विकासकामे केली ; मात्र अद्यापही पाणी, कचरा व ड्रेनेजची समस्या बाकी आहे. महापालिकेने सर्वप्रथम या भागाला भामा आसखेड योजनेचे पाणी उपलब्ध करून द्यावे.**
**- वसुंधरा उबाळे, सरपंच, वाघोली (राष्ट्रवादी कॉंग्रेस)**

**"जिल्हा परिषद व ग्रामपंचायतच्या माध्यमातून विकासकामे केली आहेत. पीएमआरडीए जरी सध्या नवीन पाण्याची योजना राबवत असले, तरी 'भामा आसखेड'चे पाणी वाघोली परिसराला द्यावे.**
**- ज्ञानेश्वर कटके, जिल्हा परिषद सदस्य (शिवसेना)**

- **कमलाकर सातव (कॉंग्रेस) :** वाघोलीत पायाभूत सुविधा उपलब्ध करणे आता महापालिकेची जबाबदारी आहे. प्रशासनाने लवकरात लवकर या भागातील समस्या सोडवाव्यात.
- **संजय सातव (माजी सदस्य, जिल्हा नियोजन समिती) :** वाघोलीच्या महापालिकेत समावेशाची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. आता महापालिकेने त्वरित वाघोलीच्या समस्या सोडवाव्यात.

# पाणीपुरवठा




वाघोलीमध्ये पाण्याची समस्या गंभीर होती. नागरिकांना उन्हाळ्यामध्ये पाणी टंचाईला सामोरं जावं लागत असे. यावर कायमस्वरूपी मार्ग काढण्यासाठी ग्रामपंचायत आणि पुणे महानगरपालिकेच्या माध्यमातून वेळोवेळी प्रयत्न केले. यामध्ये ग्रामपंचायतच्या माध्यमातून **मदरमेरी सोसायटी, साईराज पार्क 1-2-3, इंकाई सोसायटी व फुलमळा रोड** वरती असलेल्या सर्व सोसायट्यांना पाणीपुरवठा करण्यासाठी **26,47,443 रुपयांचा निधी** मंजूर करून वितरणनलिका टाकण्यात आली.

तसेच **नगर रोड ते तांबे हाऊस, विनायक पार्क, ते खंडोबा मंदिर, बालाजी पार्क ते बालाजी विहिर** येथे देखील वितरणनलिका टाकण्यात आल्या. याला जवळपास **15,81,965 रुपयांचा निधी** मंजूर करण्यात आला होता. याचबरोबर वॉर्ड क्रमांक सहा मधील सर्वच ठिकाणी पाणी पोहोचलं पाहिजे या अनुषंगाने काम करण्यात आले. PMRDA पाणी योजना, भामा आसखेड पाणी योजना, तसेच महानगरपालिकेच्या माध्यमातून नवीन पाण्याच्या लाईन टाकणे व पूर्वी टाकलेल्या लाईन्सची वेळोवेळी डागडूजी करण्यात आली आहे.

सकाळ



## वाघोलीसाठी पाण्याचे आरक्षण देण्याची मागणी

**वाघोली, ता. २९ :** वाघोलीसाठी, वढू खुर्द येथील बंधाऱ्यातून पाणीउपसा करण्यासाठी पाण्याचे सुधारित आरक्षण लवकर द्यावे, अशी मागणी मनसेचे संदीप सातव यांनी जलसंपदा विभागाकडे केली आहे.

वाघोलीला सध्याच्या पाणीपुरवठा योजनेमधून वाढत्या लोकसंख्येला पाणीपुरवठा करता येत नाही. जुन्या आणि नव्या पाणीपुरवठा योजनीतील त्रुटी दुरुस्ती करून लवकरात लवकर सुधारित आरक्षण देण्यात यावे. हे आरक्षण मिळाल्यास नवीन पाणी योजनेचे काम लवकर सुरू होऊ शकेल. असे निवेदनात म्हटले आहे. संदीप सातव, मंगेश सातव यांनी शाखा अभियंता अं. तु. नारायणकर, सहा.मुख्य अभियंता जी. के. जोशी यांची भेट घेऊन निवेदन दिले.

**पुणे : वाघोलीसाठी वढू खुर्द येथील बंधाऱ्यातून पाणीउपसा करण्यासाठी पाण्याचे सुधारित आरक्षण लवकर द्यावे. अशी मागणी मनसेचे संदीप सातव यांनी जलसंपदा विभागाकडे केली आहे.**

Pune, HadapsarToday
30/01/2019 Page No. 7





City | Pune Times Mirror

# Wagholi looks at old well for water needs

**Local group finds 80-year-old well's content fit for consumption**



The well is located in Vadjai, near Gaothan

Vijay.Chavan
@timesgroup.com
TWEETS @cvijay MIRROR

A group of locals in Wagholi have found a solution for the problem of water scarcity which has plagued that area, one of the most populated suburbs of Pune.

Wagholi has been facing a water problem for a decade with the proposed Bhama-Askhed project stuck in limbo. The Maharashtra Jeevan Pradhikaran water supply has also been inadequate for many societies who have been forced to spend on tankers.

In the midst of this, the group located an 80-year-old well which was lying abandoned for the past 20 years. In the past, it was the only source of water supply to Wagholi village. The well is locat-

"We recently thought of to check the status of water in the old well. We were stunned to see that water was clean and there was no sign of contamination," he said.

"With the help of other residents, we submitted the proposal to gram panchayat. We subsequently tested the water and found that this was safe for consumption," he added.

Another member of the group claimed that the well had enough water to service the entire stretch of Baif Road, about 100 housing societies.

The discovery has spurred more efforts to find alternative sources for water. Natraj Satav, another member of the group, said, "Subsequently, we suggested that Khari Vihir, situated near Wagholi Lake, be tapped. This will help deal with the crisis better in that area."

Sandeep Satav, deputy sarpanch, said, "We have given a nod to this proposal, considering

पुरुष सशक्त झाला तर,
एक व्यक्ती सशक्त होईल;
पण एक महिला सशक्त झाली तर,
राष्ट्र सशक्त होते.

# महिला सक्षमीकरण



## सौ.रत्नमाला संदिप सातव

» **नगरसेविका :** पुणे महानगरपालिका
» **सदस्य :** स्थायी समिति पुणे महानगरपालिका

# महिला सक्षमीकरण




विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी रत्नदीप सोशल फाउंडेशनच्या अध्यक्षा रत्नमाला संदिप सातव यांच्या नेतृत्वात, पूजा मेहंदी आर्टिस्ट आणि BJS कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने **भव्य रांगोळी व मेहंदी स्पर्धेचे आयोजन** BJS कॉलेजच्या आवारात करण्यात आले होते. शेकडो सहभागी स्पर्धकांनी अतिशय सुरेख आणि उत्कृष्ट अशा मेहंदी आणि रांगोळीच्या कलाकृती यावेळी सादर केल्या.

वाघोलीतील महिलांसाठी **लाडकी बहिण सक्षमीकरण कार्यशाळा** 3 मार्च ते 9 मार्च 2025 दरम्यान आयोजित करण्यात आली होती. यामध्ये **मेहेंदी, रांगोळी, नथ मेकिंग, फ्लॉवर ज्वेलरी मेकिंग, रुखवत ब्रायडल साडी पॅकिंग, प्रेस नेल आर्ट, सेल्फ मेकअप आणि हेअर स्टाईल** अशा गोष्टींचा समावेश होता. यामध्ये **1000 पेक्षा जास्त** महिलांनी सहभाग घेतला होता.

लाडकी बहिण सक्षमीकरण कार्यशाळेत सहभागी झालेल्या महिलांसाठी रांगोळी व मेहेंदीची स्पर्धा आयोजीत करण्यात आली होती. त्याचा बक्षिस वितरण समारंभा Wagholi Flea Nest च्या वेळेस 5 हजार नागरिकांच्या उपस्थित पार पडला होता.





# महिला सक्षमीकरण


कार्य हाच परिचय,
विकास हेच उद्दिष्ट!
प्रभाग क्रमांक. 4 | वाघोली-खराडी




BJS
भारतीय
जैन संघटनेचे
वाघोली, पुणे ४१२ २०७
कला, विज्ञान
आणि वाणिज्य
महाविद्यालय











# गौरव नारीशक्तीचा


कार्य हाच परिचय,
विकास हेच उद्दिष्ट!
प्रभाग क्रमांक 4 | वाघोली-खराडी




52 Teams
600+ Women Participants




Wagholi Flea Nest




Wagholi Flea Nest
नारी शक्ति पुरस्कार सोहळा


स्वच्छ भारत हेच खरं
देशभक्तीचं लक्षण आहे.
स्वच्छता




## कचरा मुक्त वाघोली – जबाबदारी आपली!

गावात कचरा व्यवस्थापनासाठी वेगळी यंत्रणा उभी केली गेली. ओल्या-सुक्या कचऱ्याचे वेगळीकरण, दररोज कचरा उचलण्यासाठी घंटागाडीची सोय, आणि घरोघरी जाऊन जनजागृती मोहिमा राबवण्यात आल्या. **"कचरा मुक्त वाघोली"** या उपक्रमाला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

वाघोली बुलेटीन

### कचऱ्याचा ढिगारा साफ करून काढली रांगोळी



**वाघोली : प्रतिनिधी**

वाघोली-केसनंद रोडवरील पीएम पीएमएल बस स्टॉपजवळ दुकानदार, नागरिकांकडून कचरा टाकला जात असल्याने रस्त्याच्या दोन्ही बाजूला कचऱ्याचे ढीग साचले होते. गुरुवारी (दि.१६) वाघोली ग्रामपंचायतीच्या वतीने विशेष स्वच्छता मोहीम राबवून येथील कचरा हलविण्यात आला आहे. याठिकाणी स्वच्छ वाघोली, सुंदर वाघोली अक्षरासह रांगोळी काढण्यात आली असून नागरिकांनी येथे कचरा टाकू नये अन्यथा ग्रापंचायतीच्या वतीने दंडात्मक कारवाई केली जाईल असा फलक देखील लावण्यात आला आहे.

### तुम्ही कचरा टाका ...आम्ही रांगोळी काढू !



**हवेली । प्रतिनिधी**

वाघोली ता.हवेली ग्रामपंचायतच्या माध्यमातून गावातील कचरा गोळा केला जातो. मात्र कचरा व्यवस्थित कचरा कुंडीत न टाकता तो सार्वजनिक ठिकाणी रस्त्याकडेला टाकणाऱ्यांच्या विरोधात आता , गांधीगिरीचा मार्ग अवलंबण्यास सुरवात केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून टाकलेला कचरा उचलून त्या ठिकाणी स्वच्छतेचा संदेश देणारी रांगोळी काढण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

त्यानुसार केसनंद फाटा येथे अशा प्रकारच्या स्वच्छतेच्या संदेश देणाऱ्या रांगोळ्या काढण्यात आला.असे वाघोलीचे माजी उपसरपंच संदिप सातव यांनी सांगितले

आता पर्यंत ज्या ठिकाणी रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या त्या ठिकाणी आता कचरा टाकणे बंद झाल्याचे दिसून येत आहे. सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. मात्र गावाची व्याप्ती पाहता अनेकदा हा कचरा कोणी टाकला यावर लक्ष ठेवणे शक्य होत नसल्याने कचरा उचलून त्या ठिकाणी स्वच्छतेचा संदेश देणारी रांगोळी काढण्याचा उपक्रमाचा मार्ग अवलंबण्यात आल्याचे वाघोलीचा नवनिर्वाचित उपसरपंच मालती गणेश गोगावले यांनी सांगितले.

नागरिकांनी रस्ता वर कचरा टाकू नये आपला भाग व आपले गाव स्वच्छ ठेऊया असे आवाहन देखील यावेळी संदिप सातव यांचाकडून नागरिकांना करण्यात आले




### कचरा प्रक्रिया प्रकल्प भाडेतत्वावर चालविण्यास घेणार

**उपसरपंच संदिप सातव यांची माहिती ; विशेष मासिक सभेचा निर्णय**

**वाघोली : प्रतिनिधी**

कचरा प्रक्रिया प्रकल्प येणाऱ्या दहा दिवसामध्ये मार्गी लागणार आहे. कचरा प्रक्रिया प्रकल्पाचा रिझल्ट पाहण्यासाठी भाडेतत्वावर चालविला जाणार आहे. त्याचा रिझल्ट चांगला आल्यास सर्व वॉर्डमध्ये १० टनाचे प्रकल्प बसविण्याचा निर्णय सोमवारी (दि.१५) झालेल्या विशेष मासिक सभेमध्ये झाला असल्याची माहिती उपसरपंच संदिप सातव यांनी दिली.

वाघोलीतील कचरा व ड्रेनेज संदर्भात बोलाविण्यात आलेल्या विशेष सभेमध्ये झालेल्या निर्णयाची माहिती देताना सातव म्हणाले कि, वाघोलीतील कचरा निवारणासाठी कचरा प्रक्रिया प्रकल्प सध्या भाडे तत्वावर घेण्यात येणार आहे. सुरुवातीला एक महिना प्रकल्प ट्रायल स्वरूपात चालविण्यास घेऊन त्यानंतर ६ महिने एक लाख रुपये प्रतीमहिना भाडेतत्वावर चालविला जाणार आहे. भाडे तत्वावरील प्रकल्प यशस्वी झाल्यास सगळ्या वॉर्डमध्ये १० टनाचे प्रकल्प बसविण्यात येतील. प्रक्रिया प्रकल्पासाठी जागा उपलब्ध करून देऊन प्रकल्प कार्यान्वित होण्यासाठी दहा दिवसांचा कालावधी लागू शकतो. त्याचबरोबर कावेरी हॉटेल समोरील शासकीय जागेत व भैरवनाथ तळ्यासमोर एसटीपी(सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प) प्लांट उभारण्याचे प्रस्तावित आहे तर आव्हाळवाडी रोडने जाणाऱ्या ड्रेनेजसाठी पीएमआरडीए कडे जागेची मागणी केली जाईल.





लातूर मनपा येथील कचरा प्रकल्प पाहणी.

# स्वच्छता




## स्वच्छता अभियान, "क्लिन वाघोली – ग्रीन वाघोली"

वाघोलीचे पर्यावरण स्वच्छ, निरोगी आणि सुंदर ठेवण्यासाठी आम्ही विविध स्वच्छता मोहिमा राबवल्या. **"क्लिन वाघोली – ग्रीन वाघोली"** या उपक्रमांतर्गत नियमितपणे सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता मोहिमा राबवण्यात आल्या. **रस्ते, गल्ल्या, नाल्या, शाळा परिसर, बाजारपेठा** अशा ठिकाणी स्थानिक नागरिक, स्वयंसेवी संस्था व कर्मचाऱ्यांच्या मदतीने मोठ्या प्रमाणावर स्वच्छता करण्यात आली.




आव्हाळवाडी रोड वरील गणेश नगर , साईराज पार्क , मदर मेरी , इंकाई , आदर्श पार्क , येथे स्वच्छता अभियान



लोकमत

ग्रामपंचायत - सोसायटीधारक संघर्ष चिघळला

### वाघोलीतील कचरा समस्या संपणार कधी?




वाघोली ग्रामपंचायत साठी 15 कचरा गाड्या





सकाळ

### वाघोलीत कचरा समस्येवर उपाय



# स्वच्छता

कार्य हाच परिचय,
विकास हेच उद्दिष्ट!
प्रभाग क्रमांक 4 | वाघोली-खराडी

## वृक्षारोपण – हरित वाघोलीचा संकल्प

वातावरण संरक्षण आणि हिरवळ वाढवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात आले. **सार्वजनिक ठिकाणी, शाळा, रस्त्याच्या कडेला आणि ओसाड जागांवर** शेकडो झाडे लावण्यात आली. या वृक्षांची देखभाल नियमितपणे केली जाते. आज या झाडांचे रूपांतर लवकरच एका हिरव्या वाघोलीत होत आहे.



अनाथ आश्रम बकोरी रोड वाघोली व लोहगाव रोड मिस्टिक मिडास सोसायटी वाघोली येथे हरित वाघोली या उपक्रमा अंतर्गत वृक्ष लागवड



वार्ड क्रं 6 मधील गणेशनगर डोमखेल रोड वाघोली येथे हरित वाघोली या उपक्रमा अंतर्गत वृक्ष लागवड



वार्ड क्रं 3मधील रोहन अभिलाषा दरेकर मोरे वस्ती येथे हरित वाघोली या उपक्रमा अंतर्गत वृक्ष लागवड



पर्यावरण दिनाच्या निमित्ताने वाघोली आव्हाळवाडी रोड येथील कोझी होम्स सोसायटी येथे वतीने वृक्षारोपण

# आरोग्य




## आरोग्य क्षेत्रात कार्य – विशेषतः कोरोना काळात

कोरोना काळ हा सगळ्यांच्याच दृष्टीने आव्हानात्मक होता. त्या काळात वाघोलीतील नागरिकांचे आरोग्य सुरक्षित राहावे यासाठी आम्ही अनेक उपाययोजना केल्या. मोफत लसीकरण शिबिरे, जनजागृती मोहीमा, मास्क आणि सॅनिटायझर वाटप, तसेच कोविड केअर सेंटरमध्ये स्थानिकांना मदत अशी कार्ये करण्यात आली. हजारो नागरिकांनी या शिबिरांचा लाभ घेतला.



कोरोना काळात फायर ब्रिगेड गाड्यांनी कोरोना प्रतिबंधक औषध फवारणी



कोरोना काळात मोफत लसीकरण





लोकमत

### वाघोली ग्रामपंचायत ऑक्सिजन प्लांट उभारणार

कार्यकारी मंडळाचा निर्णय : सातव यांची माहिती

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाघोली :** राज्यामध्ये कोरोना रोगाने थैमान घातले असून वाघोली व परिसरात वाढत्या कोरोना रुग्णसंख्येमुळे ऑक्सिजनची गरज येत्या काळात मोठ्या प्रमाणावर लागणार आहे. त्यावर मात करण्यासाठी भविष्यात ऑक्सिजनचा तुटवडा भासू नये यासाठी वाघोली ग्रामपंचायत लवकरच ऑक्सिजन प्लांट उभारणार आहे.

शनिवारी झालेल्या मासिक बैठकीमध्ये ऑक्सिजन उभारण्यासंदर्भात कार्यकारी मंडळाने सर्वानुमते निर्णय घेतला आहे. वाघोली प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सर्व शासकीय परवानगी घेऊन लवकरात लवकर ऑक्सिजन प्लांट उभारण्यासाठी ग्रामपंचायत प्रयत्नशील असणार आहे.

भविष्यातील कोरोनाची तिसरी लाट लक्षात घेता ऑक्सिजन प्लांटची गरज असल्याने ग्रामपंचायत मासिक बैठकीमध्ये ऑक्सिजन प्लांट उभारण्याची मागणी केल्यानंतर सर्व कार्यकारी मंडळाने सकारात्मक निर्णय घेतल्याचे उपसरपंच संदीप सातव यांनी सांगितले.

Hello Pune
Page No. 2 May 31, 2021
Powered by: erelego.com



### पीएमआरडीए व ग्रामपंचायतीच्या वतीने वाघोलीत कोरोना प्रतिबंध औषध फवारणी

ग्रामपंचायत, पोलीस, आरोग्य विभाग करताहेत दिवसरात्र काम






### वाघोली प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टर्स डे साजरा

वाघोली टाईम्स : प्रतिनिधी

वाघोली (ता. हवेली) येथे प्राथमिक आरोग्य केंद्रात भारतीय जनता पार्टीच्या वतीने 'डॉक्टर्स डे' साजरा करण्यात आला. कोरोना परिस्थितीतही जीव धोक्यात घालून सेवा करणाऱ्या डॉक्टरांचा वाघोली प्राथमिक आरोग्य केंद्रात भारतीय जनता पार्टीच्या वतीने डॉक्टरांच्या हस्ते केक कापून सन्मान करण्यात आला.

यावेळी दादासाहेब सातव, संदीप सातव, अनिल सातव, सुनील जाधवराव, जयप्रकाश सातव, केतन जाधव उपस्थित होते.

Digital Exclusive



# शिक्षण / फी




## RTE अंतर्गत पालकांची लुट थांबवली


शिक्षण हक्क कायद्यानुसार (RTE) अनेक खासगी शाळांकडून पालकांकडून जास्त फी आकारली जात होती. याविरोधात वेळोवेळी पालकांसमवेत जाऊन संबंधित शाळा प्रशासनाला जाब विचारण्यात आला. **"जास्त फी घेता येणार नाही"** असा ठाम पवित्रा घेत, अनेक पालकांना अनावश्यक आर्थिक बोजा टाळण्यास मदत झाली. तरीही जर शाळांनी पैसे उकळण्याचा प्रकार सुरूच ठेवला, तर भारतीय जनता पक्षाच्या वतीने आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता.







## परीक्षा पे चर्चा – विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांच्या **"परीक्षा पे चर्चा"** या प्रेरणादायी उपक्रमांतर्गत **"एग्झाम वॉरिअर्स"** या विषयावर देशभरात चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. शिरूर हवेली विधानसभा मतदारसंघात देखील ही स्पर्धा मोठ्या स्तरावर घेण्यात आली. वाघोलीतील विष्णूजी शेकोजी सातव हायस्कूलमधील तब्बल **1,425 विद्यार्थ्यांनी** सहभाग नोंदवून हा उपक्रम संस्मरणीय केला. विद्यार्थ्यांनी परीक्षेतील तणाव बाजूला ठेवून सुंदर चित्रांमधून देशप्रेम व्यक्त केले.





# पाणी पिण्याच्या प्लांटचा पाठपुरावा




## मनपा शाळेचे रूपांतर – एक सकारात्मक पाऊल

वाघोलीतील **मनपा शाळा क्र. 1 व 2** मधील विद्यार्थ्यांची संख्या सुमारे 3000 असून, शाळेची इमारत अत्यंत जीर्ण अवस्थेत होती. मोरे मॅडम यांच्या पाठपुराव्यामुळे आणि महापालिकेकडील प्रयत्नांमुळे आता शाळेचे नुतनीकरण होत आहे. **नव्या फरश्या, मजबूत दरवाजे, स्लायडिंग खिडक्या, CCTV कॅमेरे, वॉल पेंटिंगसह** संपूर्ण शाळेचा कायापालट होणार आहे.



### वाघोलीतील मनपा शाळांचा होणार कायापालट

— पालकांमध्ये समाधान आणि विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य —

वाघोली : प्रतिनिधी

वाघोलीतील मनपा शाळा क्रमांक १ व २ च्या प्राचार्या अनिता मोरे व भाजप युवा मोर्चा पुणे जिल्हाध्यक्ष संदीप सातव यांच्या प्रयत्नांमुळे शाळांच्या नुतनीकरणाला गती मिळाली आहे. त्यामुळे पालकांमधून समाधान आणि विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.

वाघोली परिसरातील महापालिकेच्या शाळा क्रमांक १ व २ या शाळांमध्ये सध्या सुमारे तीन हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीय असली तरी, या शाळांच्या पायाभूत सुविधा अभावी दयनीय अवस्था झाली होती. फुटलेल्या व टोकदार फरश्या, मोडकळीस आलेले दरवाजे आणि खिडक्या, भिंतीवरील उध्वस्त रंग, तसेच पुरेशी सुरक्षा व्यवस्था नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक जीवन धोक्यात आले होते.


शाळेच्या प्राचार्या अनिता मोरे यांनी या समस्येकडे सातत्याने लक्ष घालून पुणे महापालिकेकडे वेळोवेळी पाठपुरावा केला. स्थानिक लोकप्रतिनिधींची यामध्ये सहकार्य मिळाले. भाजप युवा मोर्चा पुणे जिल्हाध्यक्ष संदीप सातव यांच्या पुढाकाराने व प्रयत्नांमुळे अखेर या शाळांच्या नुतनीकरणाला गती मिळाली आहे. शाळेच्या नुतनीकरणात आधुनिक सुविधांचा समावेश करण्यात येणार आहे. नवीन टाइल्स, मजबूत लाकडी व स्टील दरवाजे, स्लाइडिंग खिडक्या, सर्व वर्गांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे, आणि शाळेच्या संपूर्ण इमारतीचे रंगरंगोटी केली जाणार आहे. याशिवाय, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक त्या बाबींचा विचार केला जात आहे.

शाळा ही केवळ शिक्षण घेण्याची जागा नसून, ती विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना आकार देणारी प्रयोगशाळा असते. म्हणूनच त्यांना स्वच्छ, सुरक्षित आणि प्रेरणादायी वातावरण देणे ही सामूहिक जबाबदारी आहे. शाळांच्या नुतनीकरणासाठी प्रशासनाचेही तातडीने सहकार्य लाभले आहे. - संदीप सातव (जिल्हाध्यक्ष, भाजप युवा मोर्चा, पुणे)













मनपा शाळा नं. 1 व 2 येथे Zensar Foundation च्या CSR (Corporate Social Responsibility) निधीतून तब्बल ₹12 लाख खर्च करून अत्याधुनिक RO + UV जलशुद्धीकरण यंत्रणा उभारण्यात आली आहे.

# Sandip Satav Quick Response Team




वाघोली परिसरातील नागरिकांच्या आरोग्य आणि सुरक्षिततेसाठी **Sandip Satav Quick Response Team** मागील तीन वर्षांपासून सातत्याने कार्यरत आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर डेंग्यू, मलेरिया यांसारख्या रोगांचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी वाघोलीतील विविध भागांमध्ये, सोसायट्यांमध्ये **वेळोवेळी औषध फवारणी** केली जाते. या उपाययोजनांमुळे अनेक घरांमध्ये आरोग्याचा धोका टळतो आणि साथीच्या आजारांपासून नागरिकांचे संरक्षण होते.

Sandip Satav Quick Response Team केवळ आरोग्यपूरक उपायांपुरती मर्यादित नाही. वाघोली परिसरात उद्भवणाऱ्या विविध तातडीच्या समस्यांवर देखील आमची टीम वेगाने आणि जबाबदारीने प्रतिसाद देते. **खराब रस्ते, उघडलेले चेंबर, सार्वजनिक ठिकाणच्या अडचणी, हॉस्पिटलमध्ये रुग्णांसाठी आवश्यक तात्काळ मदत, महिला संबंधित तक्रारी** अशा अनेक बाबींवर तत्काळ कृती केली जाते. ही टीम वाघोलीकरांच्या सुरक्षिततेची एक विश्वासार्ह भिंत आहे. भविष्यातही ही सेवा आणखी व्यापक व प्रभावी करण्याचा आमचा संकल्प आहे.








Sandip Satav Quick Response Team च्या गाडीचे उद्घाटन करताना.












# Sandip Satav Quick Response Team

















# महिला क्रिकेट स्पर्धा-2024-25




**RATNADIP SOCIAL FOUNDATION**
PRESENTS

## WAGHOLI WOMENS PREMIER LEAGUE - 2025

ORGANIZER
**RATNAMALA SANDIP SATAV**
**SANDIP (AABA) SATAV**

**वाघोली वुमेन्स क्रिकेट प्रीमियर लीग 2024-25** ही वाघोलीसाठी एक अभिमानास्पद आणि ऐतिहासिक स्पर्धा ठरली. वाघोलीमध्ये प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणावर महिला क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले, ज्यामध्ये एकूण **52 महिला संघांनी सहभाग घेतला** आणि **600 पेक्षा अधिक** महिला खेळाडूंनी आपली क्रिकेटमधील कौशल्ये दाखवत सहभाग नोंदवला. ही केवळ स्पर्धा नव्हे तर महिलांना खेळाच्या माध्यमातून एक हक्काचे व्यासपीठ देण्याचा आमचा प्रयत्न होता. सौ रत्नमाला संदिप सातव यांच्या नेतृत्वाखाली या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

संपूर्ण वाघोलीतील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला, दररोज **5000 पेक्षा जास्त** नागरिकांनी मैदानावर येऊन खेळ बघण्याचा आणि खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचा आनंद घेतला. ही वाघोलीतील एकमेव आणि ऐतिहासिक महिला क्रिकेट स्पर्धा ठरली असून या माध्यमातून महिलांच्या सशक्तीकरणाला खऱ्या अर्थाने चालना मिळाली आहे. या यशस्वी आयोजनानंतर **दुसऱ्या सिझनची घोषणा लवकरच करण्यात येणार आहे,** ज्याची उत्सुकता सर्व महिलांना आहे.



# महिला क्रिकेट स्पर्धा-2024-25














सकाळ

## राजकारणातील टोलेबाजीचे मैदानावर प्रात्यक्षिक

### चंद्रशेखर बावनकुळे, गोरे, रावल यांचे फलंदाजीतील कौशल्य प्रदर्शित



**वाघोली** : रत्नदीप फाउंडेशन आयोजित महिला क्रिकेट प्रीमियर लीगच्या उद्घाटनप्रसंगी प्रसंगी टोलेबाजी करताना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे.

**वाघोली, ता. १२** : राजकारणात अनेकदा बोलण्याच्या माध्यमातून टोलेबाजी करणाऱ्या तीन कॅबिनेट मंत्र्यांनी वाघोलीतील मैदानावर क्रिकेट खेळण्याचा आनंद लुटताना फलंदाजीचे कौशल्य सादर केले. रत्नदीप फाउंडेशनतर्फे आयोजित महिला क्रिकेट प्रीमियर लीगच्या उद्घाटनप्रसंगी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, ग्रामविकास मंत्री राजकुमार गोरे व राजशिष्टाचार मंत्री राजकुमार रावल यांनी हा योग जुळून आणला.

या मंत्र्यांनी प्रत्येकी दोन फटके म्हणजे एक डझन चेंडू टोलविण्यासाठी सर्व ताकद एकवटली. शालेय-महाविद्यालयीन जीवनातील क्रिकेटच्या आठवणींनाही त्यांनी उजाळा दिला. उद्घाटन सोहळ्याला त्यांचे पाठोपाठ आगमन झाले. सर्वांत आधी गोरे, मग बावनकुळे आणि त्यानंतर रावल अशी फलंदाजीची क्रमवारी होती. त्यांनी संयोजक तसेच सहभागी स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या.

आमदार राहुल कुल, अनुप मोरे, निवेदिता एकबोटे, प्रदीप कंद, रामदास दाभाडे, संदीप भोंडवे, श्याम गावडे, आबासाहेब सोनवणे, संतोष देशमुख, अनिल सातव, महेंद्र भाडळे, जयेश शिंदे आदी या वेळी उपस्थित होते. रत्नदीप फाउंडेशनच्या संदीप सातव व रत्नमाला सातव यांनी स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेत ५२ संघांच्या माध्यमातून ६५० महिला क्रिकेटपटू सहभागी झाल्या आहेत.

> पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकसित भारताचा, तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विकसित महाराष्ट्राचा संकल्प केला आहे. यामध्ये केवळ रस्ता, वीज, पाणी अशा सुविधांप्रमाणेच क्रिकेटसह क्रीडा क्षेत्राचीही प्रगती करण्याचा संकल्प आहे. क्रीडा क्षेत्रातही भारताने आघाडी घ्यावी म्हणून मोदीजी प्रोत्साहन देतात.
> **- चंद्रशेखर बावनकुळे**, महसूलमंत्री

> राष्ट्रकुल, ऑलिंपिक, आशियाई या क्रीडा स्पर्धांत भारत लक्षवेधी यश मिळवेल. यात महाराष्ट्र अव्वल क्रमांकावर असेल. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत नक्कीच भगवा फडकेल.
> **- राजकुमार रावल**, राजशिष्टाचार मंत्री

> मी ग्रामविकासमंत्री असलो आणि वाघोलीचा महापालिकेत समावेश झाला असला तरी या परिसराच्या विकासासाठी मला जे शक्य आहे ते करेन.
> **- जयकुमार गोरे**, ग्रामविकासमंत्री

Pune, Pune-Today
13/01/2025 Page No. 3

लोकमत

मस्ट READ

## वाघोलीत तीन मंत्र्यांनी केली बॅटिंग



वाघोलीत महिला क्रिकेट प्रीमियर लीग मध्ये तीन मंत्र्यांनी केली बॅटिंग.

### रत्नदीप सोशल फाउंडेशन महिला क्रिकेट प्रीमियर लीगचे उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाघोली** : राज्यातील राजकारणात बोलण्याच्या माध्यमातून बोलून बॅटिंग करणाऱ्या तीन कॅबिनेट मंत्र्यांनी वाघोलीत महिला प्रीमियर लीग स्पर्धेच्या निमित्ताने खरीखुरी बॅटिंग करत लीगचे उद्घाटन केले.

ग्रामविकास व पंचायत राजमंत्री राजकुमार गोरे, महसूलमंत्री चंद्रकांत बावनकुळे व पणन राजशिष्टाचारमंत्री राजकुमार रावल यांनी क्रिकेटचा आनंद लुटला. संदीप सातव रत्नदीप सोशल फाउंडेशन यांच्या वतीने आयोजित महिला क्रिकेट प्रीमियर लीगमध्ये ६५० महिला सहभागी झाल्या आहेत. याप्रसंगी आमदार राहुल कूल, अनुप मोरे, निवेदिता एकबोटे, प्रदीप कंद, रामदास दाभाडे, अनंता कटके, आबासाहेब सोनावणे, गणेश कुटे, राजेंद्र सातव, संतोष देशमुख, महेंद्र भाडळे, जयेश शिंदे, प्रदीप सातव, संदेश आव्हाळे, प्रमोद भाडळे, जयश्री सातव, बाबासाहेब हरगुडे आदी उपस्थित होते.

**५२**
महिलांचे संघ राज्यभरातून झाले सहभागी

Hello Pune
Page No. 9 Jan 15, 2025
Powered by: erelego.com

# महिला क्रिकेट स्पर्धा-2024-25






## वाघोली वुमेन्स क्रिकेट लीग-२०२५ ची यशस्वी सांगता

वाघोली : प्रतिनिधी

गेल्या एक महिन्यांपासून सुरू असलेल्या वाघोली वुमेन्स क्रिकेट लीग-२०२५ ची यशस्वी सांगता २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनी उत्साहात झाली. या स्पर्धेत वाघोलीतील महिलांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग घेतला होता. तब्बल ५२ संघ आणि ६०० हून अधिक महिलांनी सहभाग नोंदवला. भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संदिप सातव आणि रत्नदिप सोशल फाउंडेशनच्या अध्यक्षा रत्नमाला संदिप सातव यांनी स्पर्धेचे यशस्वी आयोजन केले होते.

पंधरा दिवसांहून अधिक काळ चाललेल्या या स्पर्धेत महिलांनी क्रिकेटचा मनमुराद आनंद घेतला. काही महिलांनी स्वखर्चाने कोच लावून, टर्फ बुक करून रात्री उशिरापर्यंत सराव केला. हा त्यांचा समर्पणभाव आणि उत्साह वाखाण्याजोगा होता. पार पडलेल्या स्पर्धेत ऑर्चिड स्टॉर्मस (Orchid Storms) संघाने प्रथम क्रमांक पटकावला तर मुलीक स्टिकर्स (Mulik trikers) दुसऱ्या क्रमांकावर राहिला. युनायटेड ब्लू (United Blue) तिसऱ्या स्थानावर तर उत्सव स्पाटन्स (Utsav Spratance) चौथ्या स्थानावर राहिले. प्रत्येक संघाने दाखवलेला कष्ट, सातत्य, त्याग आणि समर्पण स्पर्धेचे मुख्य वैशिष्ट्य ठरले.

**पुढील वर्षी स्पर्धेचे आयोजन**

आगामी वाघोली वुमेन्स क्रिकेट लीग-२०२६ साठी तयारी सुरू करण्याचे आवाहन देखील संदिप सातव केले आहे. पुढच्या वर्षी देखील स्पर्धेचे आयोजन करण्यात येईल असं सातव यांनी सांगितले.

**अंतिम सामन्याला ३ हजारांपेक्षा अधिक नागरिकांनी केली होती गर्दी**

**महिलांच्या सुरक्षितेसाठी हेल्पलाइन नंबर**

महिला सुरक्षितेसाठी ९८२२० २३४५६ हा हेल्पलाइन नंबर जारी करण्यात आला आहे. वाघोलीतील कोणतीही महिला कोणत्याही अडचणीत असल्यास, कोणतीही मदत पाहिजे असल्यास या क्रमांकावर संपर्क करू शकते. मदत मागणाऱ्या महिलांची गोपनीयता राखली जाईल. हा क्रमांक ३६५ दिवस २४ तास सुरू राहणार आहे.

"वाघोलीतील नागरिकांसाठी लवकरच विविध सामाजिक आणि विकासात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच कोणत्याही समस्येसाठी नागरिकांनी कार्यालयाशी संपर्क साधावा किंवा थेट फोन करून माहिती द्यावी. समस्येवर निश्चित तोडगा काढला जाईल.

- संदीप सातव (पुणे जिल्हाध्यक्ष, भाजप युवा मोर्चा)



Gramin_12 Jan 2025_008
12 Jan 2025
प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे.
www.dainikprabhat.com

## क्रिकेट स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी मंत्र्यांची हॅट्ट्रिक

### वाघोलीत रत्नमाला सातव संदीप सातव यांचा अभिनव उपक्रम

वाघोली, दि.११ (प्रतिनिधी)- वाघोली (ता. हवेली) येथे महिलांसाठी वुमन्स क्रिकेट प्रीमियर लीग २०२५ चे आयोजन रत्नमाला संदीप सातव व संदीप सातव यांच्या वतीने करण्यात आले होते. महिलांसाठीच्या क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन प्रसंगी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, पणन व राज्य शिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांच्या उपस्थितीने क्रिकेट स्पर्धेमध्ये मोठा उत्साह संचारला.

वाघोलीत पहिल्यांदाच होत असलेल्या वुमन्स क्रिकेट लीग २०२५ चा उद्घाटन समारंभ पार मोठ्या थाटात पार पडला. महिला क्रिकेट स्पर्धा व क्रीडा स्पर्धक यांच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन सकारात्मक व्हावा तसेच महिलांना क्रिकेट खेळण्यासाठी व्यासपीठ मिळवून देण्यासाठी हा उपक्रम राबवण्यात आला असल्याचे संदीप सातव, रत्नमाला सातव यांनी सांगितले.

मंत्री महोदयांनी क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन क्रिकेट खेळून महिलांच्या सहभागाबद्दल कौतुक केले. यावेळी दौंडचे आमदार राहुल कुल, भाजपा युवा मोर्चाचे अध्यक्ष अनुप मोरे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष प्रदीप कंद, माजी जिल्हा परिषद सदस्य रामभाऊ दाभाडे, युवा मोर्चाच्या उपाध्यक्षा निवेदिता एकबोटे, सुशील मेंगडे, अमृत मारणे, महेंद्र भाडळे उपस्थित होते.

नोकरी आणि व्यवसाय क्षेत्रात महिला अधिक प्रमाणात पुढे येत आहेत. मात्र, क्रीडा क्षेत्रात देखील महिलांचे प्रमाण वाढावे यासाठी महाराष्ट्र राज्य सरकार आगामी काळात विशेष प्रयत्न करेल'

- जयकुमार गोरे, ग्रामविकास मंत्री

**महिलांसाठीच्या क्रिकेटची सोशल मीडियात चर्चा**

वाघोलीमधील गृहिणी, कामगार, कारखानदार, तसेच युवती, शाळा, कॉलेजमधील विद्यार्थिनी आदींनी जवळपास महिनाभर या क्रिकेट स्पर्धेसाठी आपापल्या भागांमध्ये सराव केला आहे. हा सराव सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. सर्व समावेशक महिलांसाठी असणारी ही क्रिकेट स्पर्धा वाघोलीत मोठ्या चर्चेचा विषय बनली आहे.















# वाघोली–खराडी वूमन्स प्रीमियर लीग : सीजन 2




- वाघोली–खराडी वूमन्स प्रीमियर लीग सीजन 2 चे भव्य उद्घाटन केंद्रीय राज्यमंत्री मा.श्री. मुरलीधर आण्णा मोहोळ यांच्या शुभहस्ते जल्लोषात पार पडले.
- या स्पर्धेत 800 हून अधिक महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून, महिला शक्तीचा सुंदर आविष्कार घडवला.
- दररोजच्या घरगुती आणि व्यावसायिक जबाबदाऱ्यांमधून माता-भगिनींना आठवड्याच्या शेवटी आनंदाचा, विरंगुळ्याचा क्षण मिळावा, तसेच सर्वांना एकत्र येऊन टेन्शन-मुक्त आणि आनंदी वातावरणात खेळाचा उत्सव अनुभवता यावा, या हेतूने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.
- महिलांच्या सहभागामुळे परिसरात उत्साह, ऐक्य आणि सकारात्मक ऊर्जेचे वातावरण निर्माण झाले आहे.














**Wagholi Flea Nest 2025** हा वाघोलीसाठी एक आगळावेगळा आणि अभिमानास्पद उपक्रम ठरला. महिलांना उद्योजकतेसाठी प्रोत्साहन देणे आणि त्यांना स्वतःचे उत्पादने, सेवा व कौशल्य लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी एक मजबूत मंच उपलब्ध करून देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. या भव्य फ्ली मार्केटमध्ये **200+ स्टॉल्स** होते, ज्यामध्ये स्थानिक महिला उद्योजिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

खाद्यपदार्थ, हस्तकला, वस्त्र, सजावटीच्या वस्तू, बेकरी, सौंदर्यप्रसाधने अशा विविध क्षेत्रांतील उत्पादनांचा आणि सेवांचा नागरिकांनी मनमुराद आनंद घेतला. **20,000 पेक्षा अधिक** नागरिकांनी या कार्यक्रमाला भेट दिली, ज्यामुळे वाघोलीच्या सांस्कृतिक आणि आर्थिक व्यवहारात हा उपक्रम एक मैलाचा दगड ठरला.

वाघोलीमध्ये प्रथमच एवढ्या मोठ्या स्तरावर अशा प्रकारचा फ्ली मार्केट भरवण्यातआलेहोते, आणि त्याला लाभलेला प्रतिसाद पाहता हा उपक्रम दरवर्षी अधिक व्यापक आणि आकर्षक स्वरूपात आयोजित करण्यात येणार आहे, असा संकल्प करण्यात आला आहे.



# WAGHOLI FLEA NEST

























# सामाजीक कार्य




वाघोलीतील नागरिक, तरुणवर्ग आणि सामाजिक संस्थांनी आपली सामाजिक जबाबदारी ओळखून विविध स्तरांवर उल्लेखनीय कार्य केले आहे. सांगली-कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यात आलेल्या भीषण पुरामुळे 30-40 किलोमीटरपर्यंतची गावे पाण्याखाली गेली होती. अनेक कुटुंबं अन्न, वस्त्र व औषधांच्या अडचणीत होती, अशा संकटाच्या काळात वाघोलीतील तरुणांनी आणि मित्रपरिवाराने एकत्र येत, प्रत्यक्ष शिरोळ येथे जाऊन मदतीचा हात दिला. यामध्ये सर्वच **जीवनावश्यक वस्तू, आवश्यक गोळ्या, औषधे, सॅनिटरी पॅड्स व 1500 हून अधिक घरगुती कपडे** असा मोठ्या प्रमाणावर जीवनावश्यक साहित्य मदतीसाठी पाठवण्यात आली होती.

भारतीय जनता पार्टी, भारतीय डाक आणि दाक्षराजी महिला मंच यांच्या संयुक्त विद्यमाने व्यवसाय मार्गदर्शन व शासकीय योजना मेळाव्याचे आयोजन देखील करण्यात आले होते. या मेळाव्यात **आधार कार्ड अपडेट, लाडकी बहीण योजना, सुकन्या समृद्धी योजना, अपघाती विमा योजना, आयुष्मान भारत, रेशन कार्ड दुरुस्ती** यांसारख्या योजनांची माहिती व प्रत्यक्ष नोंदणीची सोय उपलब्ध करून देण्यात आली होती. या उपक्रमाला नागरिकांचा भरघोस प्रतिसाद मिळाला आणि हजारो नागरिकांनी विविध शासकीय योजनांचा लाभ घेतला.

याचबरोबर मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या कमकुवत रुग्णांसाठी वैद्यकीय उपचार मिळावेत यासाठी जनसेवा कार्यालयावर फॉर्म भरुन घेण्यात आले, असे अनेक सामाजिक उपक्रम वाघोलीमध्ये राबवण्यात आले. समाजासाठी एकजुटीने कार्य करण्याची ही भावना भविष्यातील अनेक सकारात्मक बदलांना प्रेरणा देणारी ठरते.








देवाचिये द्वारी उभा क्षणभरी |
तेणे मुक्ति चारी साधियेल्या ॥

# धार्मिक




# धार्मिक उपक्रम




## श्री रामनवमी उत्सव

वाघोलीमध्ये राष्ट्रजागर प्रतिष्ठान, दाक्षराज़ी महिला मंच व श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने श्री रामनवमीच्या पार्श्वभूमीवर भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. प्रभू श्रीराम हे सत्य, धर्म आणि आदर्श जीवनाचे प्रतीक मानले जातात. त्यांच्या गुणांचा जागर करत, या शोभायात्रेत रामभक्तांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला होता. विशेषतः महिलांचा सहभाग लक्षणीय होता, ज्यामुळे उत्सवाचा उत्साह द्विगुणित झाला. पारंपरिक वेशभूषा, ढोलताशा पथकं, भगव्या पताका आणि प्रभू श्रीरामांच्या जयघोषांनी वाघोली परिसर दुमदुमून गेला होता.





## हनुमान जयंती उत्सव

हनुमान जयंतीच्या पावन दिनी, वाघोलीतील विविध हनुमान मंदिरांमध्ये पारंपरिक पद्धतीने हनुमान जन्मोत्सव समारंभ आयोजित करण्यात येतात. मी स्वतः या सर्व उत्सवांना आवर्जून भेट देत असतो, मनोभावे दर्शन घेतो. वाघोलीकर बांधवांच्या सुख-समृद्धीसाठी व उत्तम भवितव्यासाठी प्रार्थना करत असतो. या पवित्र प्रसंगी उपस्थित सर्व भाविकांशी संवाद साधण्याचा देखील योग येतो. मंदिर परिसरात कीर्तन, आरती आणि भजनाने भक्तीमय वातावरण होत असते.






# धार्मिक उपक्रम




## श्री स्वामी समर्थ महाराज पुण्यतिथी सोहळा

**वाघोलीमध्ये पहिल्यांदाज श्री स्वामी समर्थ महाराज पुण्यतिथी व श्री गुरुचरित्र पारायण व अखंड नाम – जप – यज्ञ – प्रहर सोहळा** आयोजीत करण्यात आला होता. 7 दिवस विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. श्री स्वामी सेवा केंद्र, वाघोली यांच्यावतीने या भव्य सोहळ्याचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याने 7 दिवस संबंध वाघोलीतील वातावरण भक्तीमय झाले होते. स्वामी भक्तांनी अतिशय उत्साहात पारायण सोहळ्यात सहभाग घेतला. एकाच वेळी **5000 पेक्षा जास्त** स्वामी भक्तांनी पारायण करण्याचा विक्रम ही यावेळी केला. हा सोहळा दरवर्षी यापेक्षाही मोठ्या स्तरावर आयोजीत करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.












# धार्मिक उपक्रम




## छत्रपती शिवाजी महाराज जयंती

समाजकारणात काम करत असताना मी नेहमीच छत्रपती शिवाजी महाराजांना माझा आदर्श मानले आहे. मुठभर मावळ्यांना सोबत महाराजांनी हिंदवी स्वराज्य स्थापन केले. याच आपल्या महाराजांची जंयती दरवर्षी उत्सहात साजरी करण्याचा माझा आणि माझ्या सहकाऱ्यांचा मानस असतो. त्याचबरोबर वाघोलीमध्ये विविध ठिकाणी, सोसायटीमध्ये शिवजयंतीच्या कार्यक्रमांचे आयोजन केले जाते, त्याठिकाणी आवर्जून उपस्थित राहत असतो. महाराजांच्या विचारांचा जागर आणि नवीन पिढीपर्यंत आपला इतिहास पोहोचवणे अतिशय गरजेचे आहे.







## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव

ज्ञानसूर्य, संविधान निर्माता, महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती वाघोली परिसरात दरवर्षी अत्यंत उत्साहात व अभिमानाने साजरी केली जाते. बाबासाहेबांनी दिलेल्या विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी विविध सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. परिसरातील नागरिक, महिला, युवकवर्ग, विद्यार्थी आणि विविध सामाजिक संस्था एकत्र येऊन हा दिवस साजरा करतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वसामान्य, दीनदलित, उपेक्षित घटकांना स्वाभिमानाने, सन्मानाने जगण्याचा अधिकार दिला. त्यांच्या विचारांनी प्रेरित होऊन समाजात शिक्षण, समानता आणि बंधुता या मूल्यांची रुजवणूक करण्यात येते.







# धार्मिक उपक्रम




## दहीहंडी उत्सव 2023

भाजप युवा मोर्चा, पुणे जिल्हा यांच्या वतीने भव्य दहीहंडी उत्सव 2023 उत्साहात व जल्लोषात पार पडला होता. या उत्सवाला वाघोलीतील हजारो नागरिकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. कार्यक्रमाचे खास आकर्षण म्हणजे **मा. चंद्रकांतदादा पाटील (कॅबिनेट मंत्री), माजी मंत्री बाळाभाऊ भेगडे, लोकप्रिय आमदार राहुलदादा कुल व भाजप जिल्हाध्यक्ष प्रदीपदादा कंद** यांची विशेष उपस्थिती होती. या भव्य आयोजनामध्ये गणेश बापू कुटे, अविनाश दादा कुटे यांचे मोलाचे सहकार्य लाभले, तर माझ्या मित्रपरिवाराच्या समर्पित सहभागामुळे हा उत्सव अधिकच संस्मरणीय ठरला. हर्षोल्हास, भक्ती, परंपरा आणि युवा उत्साह यांचे एकत्रित स्वरूप म्हणजे वाघोलीतील हा दहीहंडी उत्सव!











# धार्मिक उपक्रम




## संत भगवान बाबा व संत वामनभाऊ महाराज यांचा पुण्यतिथी सोहळा...

भाऊ बाबा सामाजिक प्रतिष्ठान, वाघोली यांच्या वतीने **संत भगवान बाबा व संत वामनभाऊ महाराज यांची संयुक्त पुण्यतिथी** कार्यक्रम आयोजीत करण्यात येतो. त्यासाठी मित्र परिवाराच्या वतीने मोठ्या श्रद्धाभावाने मला आमंत्रीत केले जाते. या सर्व कार्यक्रमांत भजन- किर्तनाने वातावरण भक्तिमय होते. या निमित्ताने परिसरातील नागरिक व भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित राहतात.

तसेच आपल्या वाघोलीतील संत भगवान बाबा सामाजिक प्रतिष्ठान, यांच्यातर्फे देखील भव्य किर्तनाचा कार्यक्रम आयोजीत करण्यात येतो. यंदाच्या वर्षी **श्री.ह.भ.प. इंदोरीकर महाराज** यांच्या मंत्रमुग्ध करणाऱ्या कीर्तनाने वाघोलीत वातावरण अतिशय भक्तिमय झाले होते. वाघोली आणि खराडी-चंदननगर अशा दोन्ही ठिकाणी या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते
















# धार्मिक उपक्रम




## गणेशोत्सव

गणराज तरुण मंडळाच्या माध्यमातून गेली **20 वर्षे छत्रपती शिवाजी महाराज, लोकमान्य टिळक यांच्या विचारांचा आदर्श ठेवत** सातत्याने गणेशोत्सव साजरा केला जातो. सार्वजनिक सणाच्या माध्यमातून समाजातील एकोपाही जपला जाते आणि सामाजिक जाणीवेचं बाळकडू नव्या पिढीला दिलं जातं. यंदाच्या गणेशोत्सवाच्या काळात आपल्या **प्रभाग क्र. 4 वाघोली-खराडी-चंदननगर** भागातील विविध गणेश मंडळात भेटी देण्याचा योग आला. **सांस्कृतिक कार्यक्रम, स्पर्धा, रक्तदान शिबीर आणि समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन** मंडळांच्या माध्यमातून करण्यात आले होते. सर्वच गणेश उत्सव मंडळांच्या नियमित संपर्कात राहण्याचा आमचा प्रयत्न असणार आहे.

















# धार्मिक उपक्रम




## महाशिवरात्री पूजन सोहळा

श्री स्वामी समर्थ अध्यात्मिक व बालसंस्कार केंद्र (दिंडोरी प्रणित), शांतीवन होम्स यांच्या वतीने आयोजित भव्य महाशिवरात्री पूजन सोहळ्यात देखील सहभागी होण्याचा लाभ मिळाला. या पावन प्रसंगी **महासप्त नद्यांच्या पवित्र जलाने रूद्र जलाभिषेक, त्रिवेणी संगम प्रयागराज येथील जलाने अभिषेक, अभिमंत्रित 11 द्रव्यांनी विशेष अभिषेक तसेच महादेवाच्या 1008 नावांनी बिल्वअर्चन** करण्यात आले. शेकडो भाविकांच्या उपस्थितीत भक्तिमय वातावरणात वाघोली परिसर हर हर महादेवच्या जयघोषाने दुमदुमून गेला होता. भगवान महादेवांच्या कृपेने सर्वांच्या जीवनात सुख, समृद्धी आणि शांती नांदो, हीच प्रार्थना!









## नवरात्रोत्सव

दरवर्षी **प्रभाग क्र. 4 — वाघोली, खराडी आणि चंदननगर** परिसरातील विविध नवरात्रोत्सव मंडळांना भेट देत आलो आहे. या भेटीदरम्यान **माता-भगिनी, युवक-युवती आणि ज्येष्ठ नागरिकांशी** स्नेहपूर्ण संवाद साधत त्यांचे आशीर्वाद व शुभेच्छा घेतल्या. नवरात्रोत्सवाचा हा पवित्र सण सर्व समाजघटकांना एकत्र आणणारा, उत्साहाने भरलेला आणि सामाजिक ऐक्याची जाणीव करून देणारा आहे. या यात्रेदरम्यान **नागरिकांच्या अडीअडचणी, अपेक्षा आणि गरजाही** जाणून घेण्याचीही संधी मिळाली. सर्वांच्या उत्स्फूर्त सहभागाने आणि प्रेमळ आपुलकीने हा अनुभव नेहमी संस्मरणीय ठरतो.







# धार्मिक उपक्रम




## श्री भगवान महावीर जयंती

भगवान महावीर जयंती निमित्त श्री जैन श्रावक संघ आयोजित श्री भगवान महावीर जन्मकल्याणक दिन कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचा योग आला होता. या पावन कार्यक्रमानिमित्त सर्व नागरिकांना व जैन समाजबांधवांना भगवान महावीर जयंतीच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. अहिंसा, सत्य, अचौर्य, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह या पंचशील तत्वांचे पालन करणारे भगवान महावीर यांचे जीवन आजच्या काळात अधिक महत्त्वाचे वाटते.





## श्री जगतज्योती महात्मा बसवेश्वर जयंती

श्री जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या जयंती निमित्त, वाघोलीतील ऐश्वर्या लक्ष्मी सोसायटी येथे उपस्थित राहून बसवेश्वर महाराजांच्या स्मृतींना अभिवादन केले. जयंतीनिमित्त सुंदर व्याख्यानाचे आयोजन देखील करण्यात आले होते. यावेळी श्री बसवेश्वरांच्या जीवनातील महत्वाच्या आणि उत्स्फूर्त घटनांचा उलगडा करण्यात आला.




# काशी विश्वनाथ - अयोध्या दर्शन यात्रा




- प्रभाग क्र. 4 वाघोली–खराडी मधील नागरिकांसाठी अत्यंत भक्तिमय अशा मोफत दर्शन यात्रांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये 12,000 हून अधिक नागरिकांना अयोध्या–काशी विश्वनाथ तसेच 3,000 हून अधिक नागरिकांना अक्कलकोट दर्शन घडविण्यात आले.
- आजअखेर जवळपास 15,000 नागरिकांनी या यात्रेचा लाभ घेतला असून, त्याद्वारे प्रत्येक घरापर्यंत श्रद्धा, भक्ती आणि सकारात्मक ऊर्जेचा संदेश पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.
- या यात्रांमध्ये माता-भगिनींचे आशिर्वाद, ज्येष्ठ नागरिकांचे मार्गदर्शन, तसेच उत्साही युवक मित्रांची मनापासून साथ लाभली. भक्तिभावाने दिलेली ही सेवा समाजाप्रती आमचे कर्तव्य आणि निष्ठा दर्शविते.
- आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळे समाजसेवेच्या या वाटचालीला एक पूजनीय आणि आनंददायी स्वरूप प्राप्त झाले, याचा मनस्वी आनंद वाटतो.









# काशी विश्वनाथ - अयोध्या दर्शन यात्रा




















# अक्कलकोट दर्शन यात्रा

कार्य हाच परिचय,
विकास हेच उद्दिष्ट!
प्रभाग क्रमांक. 4 | वाघोली-खराडी

श्री स्वामी समर्थ

- अक्कलकोट दर्शन यात्रा मोठ्या उत्साहात संपन्न झाली. आपल्या प्रभाग क्र. 4 वाघोली–खराडी–चंदननगर परिसरातील तब्बल 3 हजार हून अधिक महिलांनी यात्रेत सहभाग घेतला. महिलांची अनेक दिवसांपासूनची ईच्छा होती, की अक्कलकोट येथे जाऊन स्वामींच्या पायाशी नतमस्तक व्हावे, महिलांची ही ईच्छा पूर्ण करण्याचे सौभाग्य आम्हाला लाभले. ही संधी श्री स्वामी समर्थ महाराजांच्या कृपेने आम्हाला लाभली.

- ह्या यात्रेत यात्रेकरू महिलांची प्रवासाची, जेवणाची, सुरक्षेची, आरोग्याची सर्व सुविधा चोख ठेवण्यात आली होती.  कोणालाही कसल्याही प्रकारची अडचण जाणवायला नको, याची काळजी घेतली.

- तसेच यावेळी महिलांशी संवाद साधण्यासाठी स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले. मेळाव्याच्या माध्यमातून सर्वांना एकत्रित संवाद साधता आला आणि ही यात्रा अध्यात्माची एक अनोखी पर्वणी ठरली.







# प्रशासकीय बैठका




वाघोलीच्या विकासासाठी विविध प्रशासकीय विभाग, संबंधित अधिकारी, मंत्री व पालकमंत्र्यांसोबत वेळोवेळी बैठकांचे आयोजन करण्यात आले. या बैठकीत विकासकामांचा पाठपुरावा करून अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यात यश आले.



पुणे महापौर श्री मुरलीधर आण्णा मोहोळ यांची भेट




MSEDCL अधीक्षक अभियंता यांच्या सोबत चर्चा




पुणे मनपा क्षेत्रीय कार्यालय येथे अढावा बैठक



“Traffic Free Wagholi”
बनवण्याच्या उद्देशाने बैठकीचे आयोजन

# आंदोलने




वाघोलीच्या विकासासाठी विविध मुद्द्यांवर नागरिकांच्या सहभागाने आंदोलन करण्यात आली. **पाणीपुरवठा, रस्ते, ड्रेनेज व कचरा व्यवस्थापन, तसेच शासकीय शाळा व आरोग्य सुविधा या महत्त्वाच्या विषयांवर प्रशासकीय यंत्रणेला जाग आणण्यासाठी शांततामय व लोकशाही मार्गाने आंदोलने झाली.** या प्रयत्नांमुळे पाणीपुरवठा सुधारणा, रस्ते दुरुस्ती व रुंदीकरण, ड्रेनेज कामे व नियमित कचरा व्यवस्थापन, तसेच नवीन शासकीय शाळा व आरोग्य सुविधा उभारणीस गती मिळाली. नागरिकांच्या एकजुटीच्या आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे अनेक प्रश्न मार्गी लागले.



सकाळ

कोरेगाव भीमा (ता. शिरूर) : मुख्यमंत्र्यांना स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाची आठवण करून देणारी १००० पत्रे पाठवण्यासाठी जमलेले भाजयुमोचे पदाधिकारी व कार्यकर्ते.

**कोरेगावातून मुख्यमंत्र्यांना भाजपच्या वतीने पत्रे**

**कोरेगाव भीमा :** स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाची आठवण करून देण्यासाठी भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने कोरेगाव भीमा (ता. शिरूर) येथून १००० पत्र मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थान असलेल्या वर्षा बंगल्यावर टपालाने पाठवण्यात आली. भाजप युवा मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी प्रदेशाध्यक्ष विक्रम पाटील व पुणे जिल्हाध्यक्ष किरण दगडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही पत्रे पाठविल्याचे सांगितले. तसेच, अस्मितेचा विषय असलेल्या देशाच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आपण लक्षात ठेवावा, अशी माफक अपेक्षाही या वेळी कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. या



## वाघोलीत महाविकास आघाडी विरोधात भाजपचे आंदोलन

**वाघोली : प्रतिनिधी**

राज्यातील महाविकास आघाडीच्या विरोधात मंगळवारी (दि. २५) राज्यभर भाजपच्या वतीने आंदोलने करण्यात आली. याच अनुषंगाने पूर्व हवेली तालुका भाजपाच्या वतीने वाघोली येथील केसनंद फाटा येथे धरणे आंदोलन करण्यात आले.

आंदोलनानंतर वाघोलीचे मंडलाधिकारी किशोर शिंगोटे यांना भाजप पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत निवेदन देण्यात आले.

यावेळी बोलताना माजी आमदार बाबुराव पाचर्णे म्हणाले की, महाविकास आघाडी सरकारने शेतकऱ्यांचा विश्वासघात केला असून सातबारा कोरा करू असे सांगितले होते, परंतु प्रत्यक्षात जिल्ह्यातून दोन गावे घेऊन देखावा केल्या सारखी कर्जमाफी केली आहे. तर दुसरीकडे महिलांवरील अत्याचार देखील वाढत चालले आहेत. सरकार सत्तेवर आल्यानंतर गुन्हेगारांना कायद्याचा धाक उरलेला नाही. शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी माफी नसून सरसकट फसवेगिरी असल्याचा घणाघात पाचर्णे यांनी महाविकास आघाडीवर केला.

जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष प्रदीप कंद यांनी सर्वसामान्य शेतकरी व महिला भगिनींच्या सुरक्षे विषयी धोरणावर मत मांडत भाजप सरकारच्या कामाचे श्रेय काही मंडळी घेत असल्याने निषेध व्यक्त केला.

रामभाऊ दाभाडे, रोहिदास उंद्रे, संदीप सातव यांच्यासह उपस्थित इतर पदाधिकाऱ्यांनी महाविकास आघाडी सरकार विरोधी भूमिका मांडल्या.

रामभाऊ दाभाडे, संदीप भोंडवे, धर्मेंद्र खांडरे, गणेश कुटे, रोहिदास उंद्रे, सुदर्शन चौधरी, सुनील कांचन, दादासाहेब सातव, संदीप सातव, अनिल सातव, समीर भाडळे, श्याम गावडे, स्वप्नील उंद्रे यांसह पूर्व हवेलीतील भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी लोणीकंद पोलिसांकडून पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



धरणे आंदोलन




कोरेगाव भीमा येथे युवा मोर्चाच्या वतीने 1000 पत्र
माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना वर्षा बंगल्यावर टपालाने पाठवताना.

# प्रथम राष्ट्र,
# नंतर पक्ष,
# मग स्वतः



# संघटन




**"आधी देश, मग पक्ष, नंतर स्वतः"** हा भारतीय जनता पक्षाचा मूलमंत्र मनापासून भावलेला. भारताचे यशस्वी पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी साहेब यांचं नेतृत्व, त्यांची कार्यशैली आणि राष्ट्रहिताची निष्ठा पाहून भाजपा सोबत काम करण्याचा ठाम निर्णय घेतला.

या विचारसरणीकडे आकर्षित होऊन भाजपात सक्रिय सहभाग सुरू केला आणि पक्षातील वरिष्ठ नेतृत्वाच्या विश्वासामुळे मला **भाजपा युवा मोर्चा पुणे जिल्हा संघटन सरचिटणीस** पदाची जबाबदारी सोपवण्यात आली. ही जबाबदारी स्विकारताच, मी माझ्या सहकाऱ्यांसह तात्काळ कामाला लागलो.

**तरुणांचे संघटन, सदस्य नोंदणी अभियान, कार्यकर्ता व पदाधिकारी मेळावे** याच्या माध्यमातून पक्षाचं संघटन बळकट करण्याचा प्रयत्न केला. संपूर्ण पुणे जिल्ह्यात भाजपाच्या विचारांची मजबूत तरुण फळी उभारण्यात यश मिळवले.

या कामगिरीची दखल घेत पक्षाने आणखी मोठी जबाबदारी दिली, **भाजपा युवा मोर्चा पुणे जिल्हाध्यक्ष पदाची...** ही केवळ पद नव्हे, तर जिल्ह्यातील हजारो तरुणांच्या अपेक्षांची जबाबदारी होती. वरिष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सहकाऱ्यांच्या सहकार्याने या भूमिकेचेही प्रामाणिकपणे पालन केले.

जिल्हाभर दौरे करत तरुणांच्या समस्या समजून घेतल्या, त्या संबंधित स्तरावर मांडल्या आणि मार्गी लावल्या. पक्षाचं विचारधन तरुणांपर्यंत पोहोचवणं, त्यांना संघटित करणं हे ध्येय सातत्याने डोळ्यांसमोर ठेवलं.

**भाजपा हा माझा श्वास आहे.** म्हणूनच पद कुठलेही असो, मी नेहमीच संघटनेच्या बळकटीसाठी प्रयत्नशील राहिलो आहे आणि भविष्यातही हे कार्य निष्ठेने सुरू ठेवण्याचा मी निर्धार करतो.





पंतप्रधान आदरणीय नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा सप्ताह अंतर्गत युवा मोर्चा भा.ज.पा. पुणे जिल्हा आयोजित रक्तदान, प्लाझ्मादान, वृक्षारोपण तुळापुर,शिक्रापूर,रांजणगाव , शिरूर शहर येथे कार्यक्रम




शिवभूमी जुन्नर येथे पंतप्रधान श्री नरेंद्र मोदीजी यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपा युवा मोर्चाच्या वतीने "माझी माती, माझा देश" मातीला नमन, वीरांना वंदन या कार्यक्रमाचे आयोजन



भाजपा विद्यार्थी आघाडी व युवा मोर्चा पदाधिकारी निवड

# संघटन






आ. प्रवीणजी दरेकर साहेब यांच्या उपस्थितीत
चाकण येथे प्रमुख पदाधिकारी यांची बैठक



पश्चिम महाराष्ट्र विभाग आढावा बैठक



पदवीधर मतदार नोंदणी तालुका कार्यकारिणी आढावा बैठक



पुणे पदवीधर मतदार संघ आढावा व नियोजन बैठक







दौंड, इंदापूर, बारामती , पुरंदर या तालुक्यामधील पुणे पदवीधर निवडणूक नियोजन व संघटनात्मक बांधणी





भाजपा विद्यार्थी आघाडी व युवा मोर्चा पदाधिकारी निवड




# संघटन




संकल्प महाविजय २०२४




घर चलो अभियान




जाहीर प्रवेश




रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी मुंबई येथे प्रशिक्षण शिबिर



भाजपा उत्तर पुणे जिल्हा युवा मोर्चाची नवीन कार्यकारिणीची घोषणा

# संघटन














जिल्हाध्यक्ष प्रदीप दादा कंद यांच्या नेतृत्वाखाली संघटनात्मक दौरा









# संघटन









नमो चषक



नमो चषक 2024 स्पर्धा नियोजन बैठक, जुन्नर



शिरूर हवेली विधानसभा नियोजन बैठक





"सबका साथ,
सबका विकास,
सबका विश्वास,
सबका प्रयास

\- पंतप्रधान नरेंद्र जी मोदी



# साथ जनतेची, आशीर्वाद नेत्यांचा...!






देशाचे प्रधानमंत्री
**मा. श्री. नरेंद्र मोदी साहेब**



महाराष्ट्राचे मुख्यमंत्री
**मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब**



**मा. श्री. नितीन गडकरी साहेब**
(केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री)




**मा. श्री. रविंद्र चव्हाण साहेब**
(प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र भाजपा)

# साथ जनतेची, आशीर्वाद नेत्यांचा...!






**मा. श्री. चंद्रकांत दादा पाटील**
(उच्च व तंत्रशिक्षण तथा संसदीय कार्य मंत्री, महाराष्ट्र राज्य)



**मा. श्री. मुरलीधर आण्णा मोहोळ**
(केंद्रीय राज्यमंत्री सहकार आणि नागरी हवाई वाहतूक | खासदार, पुणे)



**श्रीमती निर्मला सीतारामन**
(वित्त आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्री)



**श्रीमती पंकजाताई मुंडे**
(पर्यावरण व वातावरणीय बदल आणि पशुसंवर्धन मंत्री तथा भाजपा राष्ट्रीय सचिव)

# साथ जनतेची, आशीर्वाद नेत्यांचा...!






**मा. श्री. चंद्रशेखर बावनकुळे साहेब**
महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य



**श्रीमती अमृता फडणवीस**
उपाध्यक्षा, एक्सिस बँक संस्थापिका,
दिव्याज फाउंडेशन



**श्रीमती माधुरीताई मिसाळ**
राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य नगरविकास, परिवहन,
सामाजिक न्याय, वैद्यकीय शिक्षण,
अल्पसंख्यांक विकास व औकाफ



**मा. श्री. राम शिंदे साहेब**
सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद

# साथ जनतेची, आशीर्वाद नेत्यांचा...!

कार्य हाच परिचय,
विकास हेच उद्दिष्ट!
प्रभाग क्रमांक 4 | वाघोली-खराडी




**मा. श्री. प्रविणजी दरेकर साहेब**
(मा. आमदार विधान परिषद)



**मा. श्री. नितेशजी राणे साहेब**
(मंत्री- मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास,
महाराष्ट्र राज्य)



**मा. श्री. जयकुमार भाऊ गोरे**
(ग्रामविकास व पंचायत राज मंत्री,
महाराष्ट्र राज्य)



**मा. श्री. रावसाहेब दाणवे साहेब**
(माजी मंत्री)

# साथ जनतेची, आशीर्वाद नेत्यांचा...!






**मा. श्री. जयकूमारजी रावल साहेब**
(पणन व राजशिष्टाचार मंत्री, महाराष्ट्र राज्य)



**मा. श्री. प्रदिपदादा कंद**
(जिल्हाध्यक्ष, उत्तर पुणे (मावळ)



**श्रीमती रेणुका सिंह**
(मा. केंद्रीय राज्यमंत्री)


कार्य हाच परिचय,
प्रयत्न हीच ओळख,
सेवा हाच ध्यास,
विकास हेच उद्दिष्ट!


सक्षम महिला,
सशक्त समाज,
ध्यास परिवर्तनाचा,
निश्चय आमचा!

## संदिप (आबा) सातव यांच्या अधिकृत सोशल मीडिया अकाऊंटला फॉलो करण्यासाठी खालील QR कोड स्कॅन करा.

facebook

Instagram

X

YouTube


अधिक माहितीसाठी संपर्क:

**श्री. संदिप (आबा) सातव जनसंपर्क कार्यालय**

यागा डेयरी जवळ, आव्हाळवाडी रोड, वाघोली.

**96 5859 1001**